# ख्रिस्तायन

नाताळ ई-अंक ♦ वर्ष सहावे ♦ २५ डिसेंबर २०१६ ♦ संपादक : ख्रिस्तोफर रिबेलो



# ख्रिस्तायन

## नाताळ ई-अंक     वर्ष सहावे

## २५ डिसेंबर २०१६

### संपादक : ख्रिस्तोफर रिबेलो


**सहसंपादक – एडवर्ड डिसोजा**

**संपादन साहाय्य**

स्वप्निल रिबेलो     स्मिता ख्रिस्तोफर रिबेलो

अंक सजावट

**राजन जेरोम डिमेलो**

अंक मांडणी व तांत्रिक सहकार्य

**वनवसई टिम**



© सर्व हक्क लेखक व कवींच्या स्वाधीन


**संपर्क / अभिप्राय**

आमच्याशी संपर्क साधावयाचा असल्यास आणि आपल्याला काय आवडलं, काय नाही ते आम्हाला कळवण्यासाठी खालील पत्त्यांवर ई-मेल करा वा फोन करा


ख्रिस्तोफर रिबेलो :- chrisrebello25@gmail.com

(9819436078)

१वसई :- admin@onevasai.com



**आभार**

आमचे सर्व लेखक, कवी, हितचिंतक व प्रसिद्धी देणारे सर्व प्रसार माध्यमे यांचे " ख्रिस्तायन" तर्फे मन:पूर्वक आभार व नाताळ आणि नव वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा.



**या अंकात प्रसिद्ध झालेल्या मताशी संपादक मंडळ सहमत असतीलच असे नाही**


## अंतरंग


संपादकीय...

**कथा / ललित लेख :-**

देशातील ख्रिस्ती संतांची मंदियाळी - जोसेफ तुस्कानो

ईश्वरा मला क्षमा कर! - सायमन मार्टिन

शरदाचं चांदणं - प्रा. नेहा सावंत

संध्याकाळचं मळभ - इग्नेशियस डायस

नवा नाताळ - बेर्नादेत रूमाव

आपले शिक्षण - फ्रान्सिस आल्मेडा

आशीर्वाद - सायमन रॉड्रिग्ज

बय - सचिन मेंडीस

रियुनियन - सॅबी परेरा

कोरी गड नाईट ट्रेक - एडवर्ड डिसोजा

जेवण - एमेल आल्मेडा.

पतझड - रॉबर्ट फर्नांडिस.

**कविता / चारोळया :-**

1970 मध्ये जन्म झाल्यानंतर - वर्जेश ईश्वरलाल सोलंकी

प्रगती - महेश लीलापंडित

हिंदोळा - फेलिक्स डिसोजा

ही अनामयात्रा नाममात्र - सबिना फोस

ख्रिस्त... - बर्नड लोपीस

माझे अवसान - आयवन क्रास्टो

ती - डॉ. रिबेका विनीत दोडती.

नव्या युगाची झाली पहाट - फ्रँक डॉ. मिरांडा

स्त्री - मॅल्सिना मायकल तूस्कानो

जगाचा तारक - सुदेश कांबळे

**कलाकुसर :-** ऑस्टिन डाबरे     ऑल्विन कोरिया

रॉयल बी. रॉडिग्ज

# संपादकाच्या लेखणीतून...

आपल्या वसईतील ख्रिस्ती समाजाला एवढा मोठा साहित्यिक वारसा असताना आपण मात्र तसे या साहित्यिक मेजवानीपासून दूरच आहोत. आतापर्यंत आपल्या परिसरात प्रसिद्ध होत असलेल्या मासिक-पाक्षिक यांचे नाताळ सणानिमित्ताने फक्त विशेषांक प्रकाशित होत असतात परंतु पुर्णपणे नाताळ सणानिमित्ताने प्रकाशित होणारा “ख्रिस्तायन” हा पहिला प्रिंट व एकमेव ऑनलाइन नाताळ अंक आहे. नाताळ सणाचा आनंद, हौस आणि मजा काही औरच असते.. प्रत्येक जण आपआपल्या परीने नाताळ सणाची मजा लुटतोच.. आम्हीही ह्याच आनंदात हौसेने मजा लुटण्यासाठी गेली सहा वर्षे “ख्रिस्तायन” ऑनलाइन नाताळ अंकाद्वारे सामील होत आहोत..

वसई परिसरातील नव लेखक-कवींना आणि चित्रकारांना आपल्या साहित्य कृतीद्वारे आणि कलेद्वारे लोकांसमोर आणण्यासाठी एक चांगला “प्लॅटफॉर्म” म्हणून हा अंक आहे आणि असणार आहे, पण त्याच बरोबर प्रथितयश लेखक-कवींना सुद्धा आम्ही या चळवळीत सामावून घेतले आहे. ही चळवळ अधिक फोफावी अशी आमची इच्छा आहे किंबहुना असे अधिकाधिक नाताळ अंक प्रकाशित व्हावेत.

मराठीत जवळपास शतकांपासूनची दिवाळी अंकांची मोठी परंपरा लाभली आहे. १९०९ सालापासून दिवाळी अंकांची मुहूर्तमेढ रोवली गेली आणि दिवाळी अंकांचा हा झेंडा आजही मानाने फडकत आहे. मराठीत जवळपास ४५० दिवाळी अंक प्रसिद्ध होतात. दिवाळी सुरु झाली की सगळ्यांनाच वेध लागतात ते दिवाळी अंकांचे. दिवाळीच्या फराळाबरोबरच साहित्याचाही फराळ चवीनं चाखला जातो. असेच वेध नाताळ सण जवळ आला की लागावेत म्हणून या दिवाळी अंकांच्या धर्तीवर नाताळ अंक काढण्याचे धाडस आम्ही केले आहे. आजच्या परिस्थितीत वाचनसंस्कृतीची बिकट वाट सुरू आहे. त्याला उत्तर देण्याचे सामर्थ्य अशा अंकातून आम्हाला निर्माण करायचे आहे कारण वाचनसंस्कृती वाढली तरच आपल्या जगण्याला नवा अर्थ आहे; वाङ्मयाची निर्मिती केवळ विचारातून नव्हे, तर अनुभवातून होते आणि हे अनुभव आपल्याला जीवन जगण्यास दिशा देणारे असतात. कला आणि साहित्य निर्मितीमध्ये अनुभूतीला पर्याय नाही.

या वर्षी आम्ही हा अंक ‘पीडीएफ’ स्वरुपात सुद्धा देत आहोत, त्यामुळे आपणास अंक वाचण्यासाठी पूर्ण वेळ ऑनलाइन असण्याची गरज नाही. आपण हा अंक डाऊनलोड करून नंतर आपल्या सोयीप्रमाणे अगदी मोबाईलवरही वाचू शकता. आपण हा अंक वाचल्यानंतर इतरांनाही कळवा.. आणि आपल्या सूचना आणि अभिप्रायांची देखील आम्ही वाट पाहत आहोत..

**नाताळ सणाच्या व नव वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा!!!**


**Merry Christmas & Happy New Year.**

# देशातील ख्रिस्ती संतांची मंदियाळी

**--- जोसेफ तुस्कानो, बोरीवली (प)**

सध्याचे २६६वे कॅथॉलिक परमाचार्य पोप फ्रान्सिस यांनी अलिकडेच केरळमधील दोन विभूतींना संतपद बहाल केले आणि विसाव्या शतकात आशिया खंडात आलेल्या संतपदाच्या लाटेला आणखी बहर आला आहे. अखिल जगतातील ख्रिस्तसभेचे तीन भाग पाडले गेले आहेत. पहिली ख्रिस्तसभा ही प्रारंभीच्या काळातली मध्यपूर्व भागात उगम पावली होती. त्यानंतर पश्चिम युरोपाबाहेर पसरलेल्या ख्रिस्तसभेला ‘दुसरी ख्रिस्तसभा’ हे नाव दिले गेले. त्यापुढे पाश्चिमात्य देशात ठाण मांडून असलेली ख्रिस्तसभा तिसऱ्या जगात हलू लागली आणि तिथे ‘तिसऱ्या ख्रिस्तसभेचा’ जन्म झाला. भारतात ख्रिस्ती धर्म तर त्याच्या प्रारंभापासून अस्तित्वात आला होता. थॉमस व बार्थोलेमोव या येशूख्रिस्ताच्या शिष्यांनी तो पसरविला होता. तरीदेखील भारतीय ख्रिस्ती मूळ ख्रिस्तसभेच्या प्रवाहात ओढले जाण्यास














काही काळ लोटला हेही खरेच. प्रारंभी त्यांचा या प्रवाहात महत्वपूर्ण वाटा नव्हता, हे सत्य आहे. परंतु आता केरळमधील फा. कुरिओकास ऊर्फ चाव्हारा आणि सि. युफ्रिसीया एलुवेंथीकन यांना २०१४च्या २३ नोव्हेंबरला व्हॅटिकनने संतपद बहाल केल्याने, तसेच काही वर्षांपूर्वी सि. अल्फान्सोना संतपद देऊन गौरविल्याने, शिवाय अजून २५ भारतीय ख्रिस्ती संतपदाच्या रांगेत उभे असल्याने आता ही परिस्थिति बदलत असल्याची चिन्हे आहेत.

ख्रिस्तसभेत संत जाहीर करताना खूप मोठ्या क्लिष्ट प्रक्रियेला सामोरे जावे लागते. संतपदासाठी उमेदवारी करणाऱ्या विभूतींच्या चमत्काराची शास्त्रोक्त चिकित्सा होते. तो तत्सम चमत्कार शास्त्रीय कसोट्यांच्या पलीकडे आहे, हे सिद्ध करावे लागते. मग, या अटी आता शिथिल झाल्या की काय अशी शंकाही उपस्थित होत आहे. भारतातील ख्रिस्तीजन अधिक धार्मिक बनले आहेत का? असाही एक अंदाज व्यक्त केला जातो आहे. इथल्या सामाजिक आणि आर्थिक प्रगतीमुळे तर तसे घडत नसावे ना? की व्हॅटिकनला इथल्या श्रद्धावंतांबद्दल जास्त आस्था वाटू लागलीय ?

काहीही कारण असो, व्हॅटिकनच्या आशिया खंडावरील कृपादृष्टीमुळे आपल्या देशावरदेखील प्रभाव पडताना दिसतो आहे. १९६३ ते १९६५ च्या दरम्यान भरलेल्या दुसऱ्या व्हॅटिकन कौन्सिलनंतर सुमारे २००० वर्षे पाश्चिमात्य देशांत घर करून असलेल्या ख्रिस्तसभेचा गुरुत्वमध्य तिसऱ्या जगाकडे सरकला व तिथे तो स्थिरावू बघत आहे. त्यामुळे ख्रिस्तसभेची १९६० साली जी भौगोलिक स्थिति होती ती १९९० मध्ये ठळकपणे बदललेली आहे. पूर्वी हाताच्या बोटावर मोजावे इतके बिशप्स (महाधर्मगुरू) आफ्रिकेत होते, त्यांची संख्या आता खूप वाढली आहे.

जपानच्या भूमीत धर्म प्रसारासाठी गेलेला आणि २५ सहकाऱ्यांसोबत ४ फेब्रुवारी १५९८ साली हुतात्मा झालेल्या वसईचा सुपुत्र गोन्सालो गार्सिया यांना १८६२ साली 'संत' म्हणून जाहीर करण्यात आले होते. मदर तेरेसा यांनी तर या मंदियाळीवर कळस चढविला हे सांगणे नलगेच. त्यानंतर संतपदाचे मानकरी ठरलेल्या आणि त्या पदाच्या विचारात घेतल्या जाणाऱ्या विभूतींची एकूण संख्या बघता हिंदू संस्कृतीने प्रभावित असलेल्या एका देशातून संतांची मंदियाळी उभी राहणे हे तिसऱ्या ख्रिस्तसभेसाठी नक्कीच भूषणावह आहे.

१९९० साली दिवंगत परमाचार्य २६४वे पोप दुसरे जॉन पॉल (तेही आता संत आहेत) यांनी "एक्सेसिया ऑफ एशिया" या बिशप परिषदेत प्रसूत केलेल्या परिपत्रकानुसार तिसरे सहस्त्रक हे ठळकपणे आशियातील ख्रिस्ती श्रद्धावंतांचे असेल. त्या पत्रकात स्पष्ट उल्लेख आहे की, "पहिल्या सहस्त्रकात 'क्रूस' युरोपच्या मातीत रोवला गेला. दुसऱ्या सहस्त्रकात अमेरिका-आफ्रिकेत त्याची स्थापना झाली. आता तिसरे शतक आशियाई देशांचे असेल, अशी आपण प्रार्थना करुया.

विसाव्या शतकाने या खंडातील संतपदाच्या मार्गावरील २०व्या शतकात ठळकपणे वाढलेली आहे आणि हा 'ट्रेंड' वाढत असल्याचे लक्षात येते. स्व. दुसरे जॉन पॉल यांच्यामुळेच तर आशिया खंडातील संतांची संख्या बळावली गेली. १९८८ साली त्यांनी व्हिएतनाममधील ११७ कॅथॉलिक हुतात्म्यांना संतपद जाहीर केले. २००२ मध्ये चीनमधील १२० विभूतींचा संतपदाचा मार्ग मोकळा केला. फिलिपाईन्स पहिला संत लोरेंझो रुईस १९८७ साली संतपदी पोचला, नंतर दुसरे संतपद २०१२ साली २५ वर्षांनंतर पेद्रो कालुंगसोड यांना देण्यात आले. भारतातील एक मिशनरी जोसेफ वाझ यांना श्रीलंकेत पुढच्या वर्षीच्या पोप फ्रान्सिसच्या भेटीत संतपद दिले जाईल. ते श्रीलंकेतील पहिले संत असतील.

वास्तविक, संतपदाची प्रक्रिया ही प्रथमतः स्थानिक भाविकांतून अंकुरीत होते. आपल्या देशात आध्यात्माची मुले खोल रुजलेली आहेत. मग धर्म कुठलाही असो. इथे श्रद्धेचा मळा सतत बहरलेला असतो. खरंतर सानेगुरूजी, महात्मा गांधी यांसारख्या विभूति "संत" म्हणून मिरवल्या गेल्या पाहिजेत. कारण त्यांनी सर्वसामान्य माणसांना सश्रद्ध करण्यासाठी आपलं आयुष्य वेचलं होतं.

# ईश्वरा मला क्षमा कर!

**--- सायमन मार्टिन**

**मनात कृतज्ञता भाव असला  की जगणं सुंदर होऊन जाते.**

**आणि जिवंत रहावेत म्हणून अनेकांचं आयुष्य कारणी लागलेलं असते,**

**पण जगण्याच्या धबडग्यात आपल्याला त्यांचा विसर पडतो.**

**जेव्हा डोळे उघडून पाहतो तेव्हा तेव्हा उशीर झालेला असतो.**

**आज माझ्यावर उपकार झाले असतील तर आजच उतराई झालं पाहिजे.**

**आयुष्य फारच तोकडं असते. मी आभार मानण्यासठी कधीही उशीर करणार नाही**.

एक हत्ती आणि सात आंधळयाची गोष्ट लहानपणी ऐकली होती. आंधळे आपआपल्या स्पर्शज्ञानाप्रमाणे हत्तीचं वर्णन करीत होते. गोष्टीत हत्ती एकच होता पण  माझ्यासमोर आता सात हत्ती आहेत आणि डोळे नसलेला असा मी नात्यांचा अर्थ सापडतो का ह्याचा धांडोळा घेतोय. मनात अपराधीपणा दाटून आलाय. डोळे असूनदेखील नात्यांचा अर्थ सापडला नाही. ज्यांनी भरभरून दिलं, वाढवलं, घडवलं त्यांना ओळखणं सोडा त्याचं स्मरणदेखील राहिलं नाही. असं का होते?  आपल्या नात्याचा परीघ आक्रसत का जातो?  आपल्याला माणसांची ॲलर्जी का वाटू लागते ?  आपल्याला माणसं खुपू का लागतात?

गांधी जिवंत असताना जगभरात  त्यांच्याबद्दल ममत्व वाटायचं आणि नसतानादेखील वाटते. लक्षावधी माणसं ह्या एका माणसाने जोडून घेतली होती. ते महात्मा होते आणि आपल्यातदेखील आत्मा आहे ह्याचं भान हरवलं की अंगणातील बाग सूकून जाते. विं.दा. करंदीकरांच्या स्पर्शाची सावली ह्या लेखात पंडित जवाहरलाल नेहरूसबंधी एक सुंदर आठवण आहे. खूप पूर्वी हा लेख वाचलेला पण तो कधी विसरेन असं वाटत नाही. एका चिमुरडीला विचारलं की नेहरूंना भेटल्यावर तुला काय वाटलं? ती तात्काळ म्हणाली, तुला त्यांच्या अंगाला स्पर्श करावासा वाटला. लेखक म्हणतो ह्यापेक्षा नेहरूंचा मोठा सन्मान असू शकत नाही. जी माणसं अंतर्बाह्य सुंदर असतात त्यांच्याच जगण्याला ’फुले येतात.

जे शब्दात मावत नाही त्याला नातं म्हणतात. गर्भातून आल्याशिवाय आई-बाप समजून घेता येत नाहीत. ज्याला आई समजते, ज्याला बाप कळतो त्याला नात्याची खोली, उंची, लांबी, रूंदी सर्व काही आकळू शकते. आईसारखं प्रेम कर असं सांगून आईचं प्रेम अनुभवता येत नाही. त्यासाठी छातीवरती करुणेचे झरे

फुटावे लागतात. मग सगळंच विश्व सोयरे होऊन जाते. जगणं सुंदर होण्यासाठी नात्याचा अर्थ उळगडावा लागतो. मग मन कृतश्रेतेने भरून जाते. हे उपकाराचे स्मरणच आपले पाय जमीनीवर ठेवते.

आयुष्य नावाचं  बहुरंगी, बहुपेडी वस्त्र नात्यांच्या वेगवेगळया धाग्यांनी गुंफलेलं असते. आजही आठवते तीस वर्षांपूर्वीची घटना. आमचा शेतीवाडीचा व्याप आहे आणि शेतकऱ्याच्या कुटुंबात गुराढोरांना मुलासारखंच वागवलं जाते. गोरा आणि हंड्या ही बैलजोडी आमची गुणाची होती. तब्बल पंधरा वर्षे ह्या जोडीने माझ्या घरासाठी काबाडकष्ट केले. काट्याकुटयांच्या रस्त्यावरून अख्ख्या कुटुंबाला सावलीच्या प्रदेशात त्यांनी नेलं. बैल म्हातारे झाले.  त्यांना कष्ट सोसवेना. नवीन जोडी आणावी लागली. आता दोन म्हातारे आणि दोन तरणेबांड असे चार बैल अंगणात होते. कसायाला बातमी लागली आणि एके दिवशी दुपारी तो ओटीवर येऊन धडकला. बैलांना कसायाचा वास येत असावा. गोरा बैल अश्रू ढाळत होता. बाबांनी कसायाला चहा दिला आणि आल्या पावली परत पाठवलं. कसाई म्हणाला ढोर म्हातारं झालंय. त्याची सेवा तुम्हाला होणार नाय. दोन पैसे येतील... त्याचं वाक्य पूर्ण व्हायच्या आतच बाबांनी त्याच्यापुढे हात जोडले आणि सांगितले पोटच्या गोळयाला कधी कोणी विकतं का रे अब्दुलभाय ?

बैलाच्या डोळयातले अश्रू बाबांच्या डोळयात उभे होते. त्यांना समोरचं काहीच दिसत नव्हतं. कठीण काळात ह्या जीवलंगांनी आधार दिला होता. मनातलं दु:ख कित्येक वेळा बैलाकडे मोकळं केलं होतं. सुखात हसलो होतो. दु:खात एकत्र रडलो होतो.

तो एक दिवस आठवतो जेव्हा बैल बाजारातून पहिल्यांदा आमच्या अंगणात येऊन दाखल झाले होते. नवीन घर, नवीन माणसं. पश्चिम महाराष्टातून पार  ठाणे जिल्ह्यातल्या वसई तालुक्यातल्या भुईगाव गावात येऊन अनोळखी वातावरणात ते उभे होते. नवीन पाहुण्यासाठी आईने सुपात तांदुळ घालून ठेवले होते. थकून भागून आलेले, तरीही बैल अन्नाला जीभ लावत नव्हते. तेव्हा बाबा बैलांच्या खांद्यावर थोपटत बोलले होते, घाबरू नका मी तुम्हाला मुलासारखं वागवीन. त्यांनी तो शब्द पाळला.

पुढे नात्याचं झाड वाढत गेलं, बहरत गेलं. त्या झाडाने सगळया घराला सावली दिली.  त्या झाडाला जी फुलं आली त्यांनी आमचं जगणं उजळवून टाकलं.

बय मरून गेली तेव्हा दिवसभर गोठ्यातल्या जनावरांनी अन्नाला स्पर्श केला नव्हता. हे कसं विसरू शकतो? दिवसभर त्यांच्याकडे जाताच आलं नव्हतं. संध्याकाळी वैरण घालण्यासाठी गोठ्यात पाऊल ठेवलं  तेव्हा बैलाच्या चेहऱ्यावर सूतक व्यापून राहिलं होतं. करुणार्त नजरेने बैल सांत्वन करीत होते. सांगत होते, दु:ख झालयं तुम्हाला पण ती आमचीदेखील  मोठी आईच होती ना? नंतर गव्हाणीकडे लक्ष गेलं तर सकाळचं वैरण तसंच पडून होतं. त्यावेळी जो हंबरडा फोडला होता तो बयच्या मृत्यूबद्दल नव्हता आर तो मुक्या जनावरांनी दाखवलेल्या शहाणपणाचा, अपार प्रेमाचा. त्याक्षणी जाणवलं की आपण एकाच गर्भातून आलेलो आहोत आणि आपली आई आहे पृथ्वी...

आता आठवण नाही त्यादिवशी काही लिहिलं होतं की नाही. कारण ते शाळेतले दिवस होते. पण कविता तेथेच रुजत गेली. मुक्या जनावरांच्या डोळयातल्या आसवानी माझ्या शब्दांचं शिंपण केलं, त्यांनी मला माणूस केलं. त्यांनी माझ्यातली हिंस्त्रता, वासना आणि क्रुरता ह्यांना पायबंद घातला.

आजी सांगायंची दुपारच्या वेळेला दारापुढे कुणीही आला तरी त्याला अन्नाविना पाठवू नकोस आणि तुझ्याकडे कुणीही मदतीसाठी आला तर त्याला विन्मुख पाठवू नकोस. ह्या तिच्या शब्दातूनच माणसाप्रती प्रेम वाटू लागलं. माणसं वाईट वागतात, माणसं डसतात तरीही त्याचं वैषम्य वाटेनासं झालं. आपण अधिक चांगलं झालं पाहिजे म्हणजे आपलं पाप गळून पडेल, आपण मुक्त होऊ म्हणून प्रवास सुरू झाला.

कधीतरी मध्यरात्री जाग येते. खाटेवर उठून बसतो. डोळे बंद करतो. एकएक चेहरा डोळ्यासमोर आणतो. चेहरे नात्यातले असतात. नात्याच्या पलिकडचे असतात. चेहरे केवळ माणसाचेच असतात, गोठ्यातल्या गुरादोरांचे चेहरे आठवतो. नावानिशी त्यांना हाकारतो. मग झाडांचे देह उभे टाकतात. मंद वाऱ्याची झुळूक माझ्या अंगाला स्पर्श करते. मी सावलीचा अनुभव घेतो. ह्याच झाडाच्या अंगाखांद्यावरती बालपण हुंदडल होतं. खेळातल्या सवंगड्याचेच चेहरे भेटीला येऊ लागतात. पूर्वी ओट्यावर जो कंदील असायचा त्याचा चेहरा समोर येतो. कंदील मला म्हणतो, इतका तापायचो की अनेकदा काच तडकुन जायची. आपलं शरीर छिनविछिन्न झालं तरीही प्रकाश देत राहिलं पाहिजे... हयालाच जगणं म्हणतात.

‘मध्यरात्र संपते, पहाट होऊ लागते, मन हलके झालेलं असते... मी स्वत: आरोपीच्या पिंजऱ्यात उभा राहतो. कित्येकांनी मला प्रेमाचा अनुभव दिलेला आहे. कित्येकांनी माझं जगणं सुंदर केलंय. ज्यांचे चेहरे ठाऊक नाहीत अशांनी मी जिवंत राहावा म्हणू आयुष्याचं दान दिलंय. त्यांना विसरलो असेन तर ईश्वरा मला क्षमा कर!

# शरदाचं चांदणं

**--- प्रा. नेहा सावंत, दहिसर**

२३ सप्टेंबर २०१४. सकाळची नेहमीची कॉलेजमधली कामं सुरू होती, परिक्षा तोंडावर आली होती त्यामुळे लगीन घाईच होती. इतक्यात ‘Whastapp’ वरची बातमी कुणीतरी वाचून दाखविली “कवी शंकर वैद्य गेले”. माझ्या हातातलं काम क्षणभर थांबलंचं. मॅनवर उदासीचा तवंग पसरला. क्षणभर मनात आलं काय झालय या वर्षाला? किती हवीहवीशी, जिंदादिल माणसं, जीवनावर भरभरून प्रेम करणारी माणसं हा काळ घेऊन जातोय! अन या सगळ्यांना ठेवतोय तरी कुठे?

माझ्या तंद्रितून मी बाहेर आले. यांत्रिकपणे सगळी कामे आवरलीही; पण त्यात मन लागत नव्हतं. तसं म्हटलं तर कवी शंकर वैद्यांचा आणि माझा फारसा परिचय नव्हता की माला त्यांचा खासा सहवासही घडला नव्हता. तरीही ज्या काही दोनचार गाठीभेटी झाल्या होत्या, त्याचा ठसा मनावर उमटलेला होताच. त्या भेटी माझ्या डोळ्यांसमोर तरळत होत्या. कवी शंकर यांना पहिलं पाहिलं ते दूरदर्शनवर. ‘प्रतिभा आणि प्रतिमा’, ‘शारदच चांदणं’, काव्यसंध्या किंवा ज्ञानेश्वरीवर आधारित हृदयनाथ मंगेशकर आणि लता मंगेशकर यांचा अप्रतिम कार्यक्रम झाला होता, अशा कार्यक्रमातून शंकर वैद्यांच निरूपण आणि निवेदन ऐकलं होतं त्याचा मनावर विलक्षण प्रभाव पडला होता. त्यामुळे त्यांची छबी परिचित झाली होती. पुढे महाविद्यालयीन काळात ‘मराठी वाङमय मंडळात’ त्यांच्या काव्य वाचनाचा कार्यक्रम ऐकला, तेव्हा त्यांच्या तरल, हळुवार कवितांनी जशी मनावर मोहिनी घातली तशी त्यांच्या प्रसन्न, ऋजू व्यक्तिमताची छापही मनावर उमटली होती. पण प्रतीक्षा त्यांच्याशी बोलण्याच धारिष्ट्य त्या विद्यार्थी दशेत नव्हतच. कवीच्या दर्शनाने आणि त्यांच्या काव्यवाचनाने दिपून भारावून जाण्याचे ते दिवस होते. कवी शंकर वैद्यांच व्यक्तिमत्व नक्कीच भारावून जाण्यासारख राजस अन देखणं होतं. गोरा वर्ण, घारेपणाकडे झुकणारे बारीक डोळे, शिडशिडीत बांधा, चेहऱ्यावर कमालीचे सात्विक भाव, आवाजात एकप्रकारची नादमयता, शांत स्निग्ध नजर, मंजुळ स्पष्ट वाणी. काव्यवाचनाच्यावेळी कवितेच्या भावानुरूप डोळ्यांत तरळणारे भाव, या साऱ्यांची मोहिनी मनावर उमटली नसती तर नवलच.

महाविद्यालयीन पदवी शिक्षण पूर्ण केल्यानंतर एम. ए. साठी आम्ही मुंबई महाविद्यालयात प्रवेश घेतला. त्यावेळी विभागप्रमुख होत्या डॉ. सरोजिनी वैद्य. शंकर वैद्यांच्या या पत्नी आहेत ही त्यांची दुसरी ओळख आम्हाला झाली. त्यावेळच्या आमच्या वयानुसार आम्ही शंकर वैद्यांची एखादी तरल प्रेम कविता वाचायचो आणि त्यात वैद्य बाईंचं चित्रण कुठे, कसं केलय का? हे शोधण्याचा प्रयत्न करायचो. वैद्यबाईंच व्यक्तिमत्व सरांइतक लोभसवाणं नव्हतं तर करारी होतं. त्या तशा कर्तव्यकठोर वाटायच्या. अर्थात त्यांचं शिकवणं, अभ्यास व्यासंग, याची एक वेगळीच छाप आमच्या मनावर उमटली होती. एक विभागप्रमुख कसा असावा, याच उत्तम उदाहरण बाई होत्या. आम्हा सगळयांच्या त्या लाडक्या होत्या. आम्ही खाजगीत गमती गमतीत म्हणायचोही, ‘सरांच्या वाणीत, स्वभावात वात्सल्य अधिक जाणवत आणि बाईंच्या वागण्या बोलण्यात पुरुषार्थ जाणवतो.’ आम्हाला कुतूहल असायच त्यांचं कौटुंबिक वातावरण कस असेल? याच. आम्ही आपापल्या परीने काहीबाही तर्क लढवून ‘टाइमपास’ करीत राहायचो.

एम. ए. झाले अन ‘प्राध्यापिका’ या भूमिकेतून महाविद्यालयात प्रवेश झाला. मी ज्यावर्षी रुजू झाले, त्याच वर्षी मराठी वाङमय मंडळाच्या कार्यक्रमात कवी शंकर वैद्य यांच्या काव्यवाचनाच आयोजन केलं होतं. दीड दोन

तासांच्या कार्यक्रमाने मुलं मंत्रमुग्ध झाली होती. प्रेमकविता, बालकविता, विडंबन अशा विविध प्रकारच्या कविता त्यांनी ऐकविल्या होत्या. त्यांच्या ऋजू  स्वभावानुसार त्यांच्या कविताही तरल हळुवार होत्या. तितकच हळुवार, लयबद्ध त्यांचं सादरीकरण होतं. त्या कवितेची पार्श्वभूमी सांगत ते कवितेच्या भावविश्वात रसिकांना घेऊन जात होते.

आली तुझी आठवण

आले मनी सांजवून

रानातल्या देवळात

घंटा वाजते मधून

ही कविता त्यांनी सादर केली, तेव्हा खरोखरच मनाने रानातल्या देवळात अन देवळातल्या गूढ गाभाऱ्यात पोहोचल्याचा अनुभव येत होता. शंकर वैद्य हळुवार कविता जितक्या अलवारपणे सादर करायचे, तसेच मिष्किल कविताही मिष्किलपणे सादर करायचे. त्यांच्या डोळयांतून ती मिष्किली अचूक व्यक्त व्हायची.

आता डोईवरी केस लागले पिकाया

एक बरे आता तिला कमी लागले दिसाया

आता बोलताना येतो कंप आवाजाला

एक बरे तिला कमी येते ऐकायला

थरथरे माझा हात काम करताना

तिला वाटे धांदलीचा स्वभावच जुना

अजूनही मला दिसते ती सुंदर

काय फसवितो चष्म्याचा नंबर.

ही कविता त्यांनी सादर करताना ‘आता डोईवरी केस लागले पिकाया’ म्हणताना नकळत स्वतःच्या डोक्यावरुन हात फिरवून कोणताही अभिनय न करताही मिष्किलीचा परिणाम  साधला होता आणि ‘काय फसवितो चष्म्याचा नंबर’ ही ओळ म्हणताना एका हातानं चष्मा नीट केला तेव्हाही रसिकांमध्ये खसखस पिकली होती हे आठवतय. आपण कवी आहोत, कवीच्या थाटात वावरल पाहिजे असा अभिनिवेश त्यांनी कधीच बाळगला नव्हता. ज्या ज्या वेळी मी त्यांना काव्यवाचनाच्या कार्यक्रमात पाहिलं किंवा दूरदर्शनच्या मुलाखतींच्या, काव्य मैफिलीच्या कार्यक्रमात पाहिलं त्या त्या वेळी त्यांनी फूल बाहयांचा शर्ट परिधान केलेला असायचा. प्लेन आकर्षक रंगांचे त्यांचे शर्ट त्यांना खुलून दिसायचे. मरून, तपकिरी, निळा, केशरी हे रंग त्यांना खुलून दिसायचे. चष्म्याची साधीशी पण आकर्षक फ्रेम, मागे वळवून व्यवस्थित बसवलेले केस असं टापटीप, नीटनेटक व्यक्तिमत्व लक्ष वेधून घ्यायचं.

मला आठवतय, आमच्या मराठी वाङमय मंडळाच्या कार्यक्रमाला आणि नंतर एकदा मिश्रभाषी कविसंमेलनाला ते आले होते. त्यांच्या काव्यवाचनानंतर मी जरा दबकतच त्यांना म्हटलं होतं,’’सर ! तुमची ‘कुंतीची आठवण’ ही कविता मला खूप आवडते, तुमच्या हस्ताक्षरात लिहून देता?’’ सरांनी अजिबात आढेवेढे न घेता ‘हो, देतो की’ असं म्हणून त्यांच्या सुंदर, रेखीव, थोड्याशा तिरप्या, नाजुक, बारीक हस्ताक्षरात ती कविता लिहूनही दिली अन त्याखाली छान सहीसुद्धा केली. कविता ‘प्रेमकविता’ होती. प्रियकर प्रेयसीला जुईची फुलं ओंजळीत देतो, पण ती फुलं आपल्या घरी कलागत लावतील म्हणून उदासमनान् नदीच्या पात्रात सोडून देते. त्यावेळी तिला कर्णाला नदीच्या पात्रात सोडणाऱ्या कुंतीची आठवण होते. कुंतीचं दुःख आणि आपलं दुःख तिला सारखच वाटतं. अशा आशयाची ती कविता होती. ती कविता त्यांनी इतक्या अलवार अन तरल पद्धतीने पेश केली होती की तिथे बसलेल्या अन तमाम प्रेमात पडलेल्या विद्यार्थ्यांना विशेषतः मुलींना ती ‘आपली’ वाटली नसती तर नवल होतं.

मी कविता लिहून मागितली खरी पण ती मागण्याच आपण धाडस करीत आहोत किंवा एवढ्या मोठ्या कवीलाच त्याची कविता 'लिहून द्या' असा हट्ट करत आहोत असं अजिबात वाटलं नाही याचं कारण म्हणजे शंकर वैद्यांचा ऋजू स्वभाव. समोरच्याला अगदी मोकळेपणा वाटेल इतकं सहज अन लाघवी व्यक्तिमत्व होतं त्यांचं. वहीच्या मागच्या पानावर कविता लिहिल्यानंतर तितक्याच सौम्य आवाजात डोळे मिचकावून किंचित मिष्किल हसत त्यांनी विचारलं, "कुणा खास व्यक्तिला द्यायचीय का?" मी फक्त लाजून हसले होते.

कार्यक्रम संपल्यानंतर आम्ही चहापान करीत एकत्र बसलो होतो. सोबत खाण्याचे काही पदार्थ मागवले होते शिवाय माझा आणि आमच्या विभागप्रमुखांचा डबाही सोबत होता. पोळीभाजी, थालीपीठ असे पदार्थ त्यात होते. त्याचाही त्यांनी मनापासून आस्वाद घेतला, तो घेताना त्यांच्यातला कवी बाजूला झाला आणि त्यांच्यातला संसारी गृहस्थ जागृत झाला आणि आमच्या गप्पा एकेक पाककृतीकडे सरकू लागल्या. 'ज्वारीच्या भाकरीबरीबर कोल्हापुरी ठेचा नाहीतर वऱ्हाडी झणका' अशी काही रंगत आणतो असं म्हणत ते पाककलेच्या एकेक टिप्स देत होते ते पाहून आम्ही अचंबित झालो होतो. सहज बोलता बोलता 'घरी अनेकदा पोळया मीच करतो त्याही घडीच्या' असं वाक्य त्यांनी उच्चारताच मी तर तिनताड उडालेच. बरं हे सांगतानाही अगदी सहजता होती त्यांच्या बोलण्यात. मी काही 'ग्रेट' करतोय असा भावही नव्हता. वैद्यबाई तेव्हा मुंबई विद्यापीठाच्या विभागप्रमुख होत्या. त्यांचा दिनक्रम व्यग्र होता. सर निवृत्त झाले होते. शिवाय घरी सरांची आजारी आई होती. त्यामुळे घराची सगळी जबाबदारी त्यांनी निवृत्तीनंतर आनंदाने स्वीकारली होती. त्यांचा एकुलता एक मुलगा शिक्षणासाठी किंवा नोकरीसाठी परदेशात होता. त्यामुळे आईची सेवा अन स्वयंपाक या दोन गोष्टींतून सरांना आनंदही मिळत होता अन विरंगुळाही.

'आई' हा सरांच्या मनाचा हळवा कोपरा होता हे त्या वयातही जाणवून गेलं. आमच्या गप्पांमध्ये त्यांच्या आईचा विषय निघाल्यावर त्यांच्या चेहेऱ्यावर आणखीच प्रफुल्लित भाव दिसले. "आई म्हणजे जुन्या आठवणींचा एक ठेवा असतो हो. आज तिच्या या वयातही (अंदाजे तेव्हा त्यांच्या आईच वय ऐशींच्या घरात नक्कीच होत) तिच्याकडे सांगण्यासारखं आणि मी ऐकण्यासारख किती आहे याची कल्पनाच करता येणार नाही. तीच वय झालेलं असलं तरी तिची स्मरणशक्ती किती तल्लख आहे". असं म्हणून त्यांनी तिच्या समरणशक्तीची एकदोन उदाहरणेही सांगितली. "आई असते म्हणूनच तिच्यामुळे आपलं 'बाल्य' कायम टिकून राहतं. आपण मोठं होऊच शकत नाही. आई घराचं मांगल्य म्हणतात ते काही उगीच नाही." असं म्हणून क्षणभर भावुक झालेलं त्यांना पाहिलं होतं. सरांची आई गेली आणि काही काळानंतर असाध्य अशा कर्करोगाशी निकराचा संघर्ष करत वैद्यबाईही गेल्या. या दोन्ही स्त्रियांचं स्थान सरांच्या आयुष्यात फार मोठं होतं. त्यांच्या जाण्याने सर पुर्णपणे एकटे,  एकाकी झाले होते.

बऱ्याच वर्षांनंतर कवी शंकर वैद्यांना पाहिलं ते कवी नारायण सूर्वेंच्या निधंनाच्या वेळी. कवी नारायण सुर्वे यांचं पार्थिव अंतिम दर्शन घेण्यासाठी लोकवाङमय गृहात ठेवण्यात आलं होतं. तेव्हा नारायण सुर्वे यांच्या पायाजवळच पण थोड्या अंतरावर एका कोपऱ्यात खुर्चीत शंकर वैद्यांना बसलेलं पाहिलं आणि आणखीनच गलबलून आलं. चेहेऱ्यावर तेच शांत, सात्विक भाव पण वयोमानानुसार शरीर काहीसं थकलेल जाणवत होतं. वैद्यबाईंच निधनही नुकतंच झालं होतं त्यामुळे आलेला एकटेपणा, एकाकीपणा त्यांच्या नजरेत समेटला होता. कितीतरी वेळ ते सुर्व्यांच्या पार्थिवाकडे अन मुक आक्रंदन करणाऱ्या कृष्णाबाईंकडे पाहत होते. कृष्णाबाईंच्या एकटेपणाच दुःख त्यांना जाणवलेल होतं. काही काही मंडळी सुर्व्यांच्या पार्थिवांच  दर्शन घेऊन, एका कोपऱ्यात बसलेल्या शंकर वैद्यांकडे आपला मोहरा वळवित होती. त्यांना ते वंदन करून ते ठीक असल्याचा हात करीत होते, पण बोलणं टाळत होते. कदाचित 'बिछडे सभी बारी बारी' असच त्यांना म्हणायच होतं का? वसंत बापट, विंदा करंदीकर, नारायण सुर्वे, दया पवार असे कवी मोहरे एकेक करून निघून जातायत, असं त्यांना वाटत होतं का? त्यांनी त्यांच्याच कवितेत म्हटल्याप्रमाणे –

गेले गेले रे संगती-सोबती
पुसट पाऊले ठेऊनी मागुती
कितीक जायाचे असेच अजून
कलला कलला दिवस कलला
उंटांच्या पायांनी दिवस चालला
लांबल्या सावल्या चालल्या सोडून

असच म्हणायच होतं का? न राहवून मी त्यांची जुजबी चौकशी केली, 'सर! बराच वेळ इथे बसलायत तुम्ही, पाणी वगैरे देऊ का?' असं विचारल्यावर मंद स्मित करीत म्हणाले, 'मी ठीक आहे, तुम्ही कृष्णाबाईंना सांभाळा''. त्यावेळी त्यांच्या आवाजात मंजुळ किणकीन नाद मला जाणवला. दादरच्या वैकुंठ स्मशानभूमीत नारायण सुर्व्यांना तोफांची अंतिम सलामी दिली त्यावेळी त्यांना डोळे पुसताना पाहिलं. थोड्यावेळाने ते कृष्णाबाईंजवळ आले. विनम्रभावाने फक्त हात जोडून उभे राहिले, कृष्णाबाईंही हात जोडून मुसमुसत उभ्या होत्या. निःशब्दपणे केवळ नजरेतूनच वैद्यसर खूप काही बोलून गेले होते.

कवी नारायण सुर्व्यांच्या निधनानंतर दोनएक महिन्यांनी माहीम सार्वजनिक वाचनालयातर्फे मला फोन आला अवधूत परळकर यांचा. ''मास्तरांची सावली'' या आत्मकथनाच्या उत्कृष्ट शब्दांकनाबद्दल तुम्हाला आणि कृष्णाबाईंना पुरस्कार देण्याचं आम्ही ठरवलं आहे.'' त्याबद्दल अभिनंदन करून कार्यक्रमाची रूपरेषाही त्यांनी सांगितली. कवी शंकर वैद्य ह्यांच्या हस्ते पुरस्कार देणार असल्याची आनंदाची बातमी त्यांनी दिली. मनात आलं कितीतरी वेळा, वैद्य सरांशी प्रत्यक्ष बोलावं असं वाटत होतं पण कधी जमलं नाही. पण आता योगायोगाने ती संधी चालून आली होती याचा मला विलक्षण आनंद झाला होता.

माहीमच्या सार्वजनिक वाचनालयाच्या छोटेखानी हॉलमध्ये अभिनेत्री रेखा कामत, केसरी टुर्सचे केसरी पाटील, पप्रदीप भिडे, विद्यावाचस्पती शंकर अभ्यंकर अशा मान्यवर मंडळींच्या उपस्थितीत अन रसिक वाचकांच्या अनौपचारिक अशा वातावरणात......... यांच्या नावाने दिला जाणारा पुरस्कार कवी शंकर वैद्य यांच्या हस्ते स्वीकारताना खूपच धन्यता वाटली. वैद्य सरांनी आपल्या छोटेखानी भाषणात 'मास्तरांच्या सावली'चं वाङमयीन आणि ऐतिहासिक योगदान पटवून देताना जे बारीक सारिक तपशील दिले होते त्यातून त्यांनी ते आत्मकथन किती मनापासून आणि मूळापासून वाचले होते याची साक्ष पटत होती. माझ्या शब्दांकनाबद्दल ते इतकं स्वाभाविकपणे आणि भरभरून बोलत होते की माझ्यासारख्या नवख्या लेखिकेनं खरच इतकं कर्तृत्व केलय का? हा प्रश्न मी माझ्याच मनाशी विचारत होते. या कार्यक्रमात जेव्हा माझं मनोगत व्यक्त करण्याची घोषणा झाली त्यावेळी मी एकूणच शब्दांकनाची प्रक्रिया आणि माझे शब्दांकनाचे अनुभव व्यक्त केले. तेव्हा माझ्या मनोगताला वैद्य सरांनी मनापासून दाद दिली, इतकच नाही तर तो कार्यक्रम संपल्यावर 'मला खास तुमचं स्वतंत्र कौतुक करायचय, तुम्हाला वेळ आहे का थोडा वेळ' असं अदबीने बोलले तेव्हा त्यांचा तो विनय पाहून मीच ओशाळले आणि म्हणाले, 'असं काय म्हणता सर? कौतुक करण्यापेक्षा त्यातले दोष दाखविण्याचा अधिकार तुमचा आहे. तुम्ही माझ्या लेखनातल्या त्रुटी सांगितल्या तर मला जास्त आवडेल'. त्यावर ते म्हणाले, 'तुमच्यातल्या चांगुलपणाने आणि अलिप्त राहून लेखन करणाऱ्या वृत्तीने त्रुटींवर मात केलीय.' असं म्हणत त्यांनी त्या पुस्तकांतली एकेक वाक्य, एकेक प्रसंग आणि कृष्णाबाईंच्या तोंडचे संवाद असे काही सांगितले की त्यांच्या या वयातल्या स्मरणशक्तीने मी अक्षरशः दिडमूढ झाले हे पाहून,' पाहा, वाचलय  की नाही मी पुस्तक? वरवरच नाही ना वाचलेल' असं पुन्हा पुन्हा विनम्रतेने म्हणत राहिले की मीच नि:शब्द झाले.

'शब्दांकन ही एक कला आहे, वाटतं तितकं सोप्पं नाही ते आणि 'स्व' विसरून 'पर'च्या भूमिकेत शिरून कायम तो तोल अन लय सांभाळणं फार कठीण काम आहे. नेहाताई, कठीण भाषा किंवा विद्वतप्रचुर भाषा वापरणं

एकवेळ सोप्पं पण साधी सरळ मनाला भिडणारी भाषा आत्मकथनात वापरण्यासाठी तितकच तादात्म्य आणि तटस्थता राखावी लागते.' हे तुमचं विधानच खूप काही सांगून जातं. खरंच शब्दांकनाची अचूक नस तुम्ही पकडली आहे. लिहित रहा." म्हणजे इतका मोठा कवी माझ्यासारख्या नवखीच भाषणही त्यांनी किती मन लावून ऐकलं होतं. माझ्यासारखीला त्यांनी असं 'मोठं' केलं होतं.

आमच्या गप्पा रंगल्या होत्या. खरंतर त्यांना लवकर निघायचं होतं पण पाय निघत नव्हता., त्यांना जिन्यापर्यंत सोडायला जाताना मी म्हटलं, 'माझं सध्या हिराताई पवार ह्यांच्या आत्मकथनाच काम सुरु आहे." 'अरे व्वा ! फारच छान. कवी दया पवार यांच्या आत्मकथनापेक्षा हे आत्मकथन फारच वेगळं असेल. का सांगू? अहो, बायकांकडे सांगण्यासारख खूप काही असत आणि ते फार प्रभावी असत. पुस्तक आलं कि सांगा नक्की आवडेल वाचायला." त्यांच्या या बोलण्याने माझ्या नव्या कामाचा ताण हलका झाला. निघता निघता मी वैद्यबाईंची विद्यार्थिनी होते असं म्हटल्याबरोबर, "तिला आज फार आनंद झाला असता" असं म्हणत क्षणभर पायरीवरच थांबले. मलाच कसंस वाटलं. विषयांतर करण्याच्या इराद्याने मी त्यांना म्हटलं, 'सर! तुम्ही इथे महिमलाच राहता ना! मी कधी भेटायला येऊ शकते?"

हो, अगदी अवश्य या. माझ्या घरचा फोन नंबर आहे ना तुमच्याकडे? नसेल तर लिहून घ्या. असं म्हणून त्यांनी त्यांचा नंबर दिला आणि सगळ्यांचा निरोप घेऊन संथपणे पायऱ्या उतरून गेले. हिराताई पवारांचं पुस्तक पूर्ण झालं कि आवर्जून त्यांच्या घरी जाऊन प्रत्यक्ष भेटूनच पुस्तक द्यायचं असं मनोमन ठरवलं. तो दिवस माझ्यासाठी खरंच खूप अविस्मरणीय होता. माझ्या लेखनाला पुरस्कार मिळाला म्हणून नव्हे तर मी केलेल्या कामाचं, त्यासाठी घेतलेल्या कष्टाचं नेमकं मर्म कुणाला तरी कळल होतं आणि ते नेमक्या शब्दांत माझ्यापर्यंत पोहोचतं केलं होतं एका ऋषीतुल्य कवीने. शेवटी प्रसववेणा काय असतात हे एक संवेदनशील कवीच जाणू शकतो ना!

यथावकाश माझ्या हातून "सांगायची गोष्ट म्हणजे...." लिहून झालं वैद्यसरांना प्रत्यक्ष भेटून पुस्तक देण्याचं ठरवलंही पण त्यांची प्रकृती ठीक नसल्याचं कळल. सरांना बर वाटलं की जाऊ भेटायला असं मनाशी ठरवलं, पण शेवटी राहूनच गेलं. 'मास्तरांची सावली' लिहून झालं तेव्हाही विंदा करंदीकरांना भेटून पुस्तकाची प्रत देण्याचं ठरवलं होतं पण त्यांच्याही प्रकृती अस्वास्थ्यामुळे त्यांना भेटणं राहून गेलं. आज ती सल पुन्हा तीव्रतेने जाणवली ती वैद्य सर गेल्यानंतर... आयुष्य किती गतिमान झालंय कि जीवनाच्या या धबडग्यात असे कितीतरी अनमोल क्षण हातातून सर्रकन निसटून जातात वाळूंच्या सरसरीत कणांसारख. आपल्या हातात पश्चातापाखेरीज काहीच उरत नाही. कधी कधी असं वाटत 'कल करेसो आज कर, आज करेसो अब' असं जे म्हटलंय ते किती खरंय. त्या त्या क्षणी मनात आल्याबरोबर कृती केली तर अशी चुटपूट मनाला लागून राहणार नाही.

वैद्य सर गेल्याची बातमी ऐकून मनात सारखी हळहळ वाटत होती. संध्याकाळी सहज रेडीओ लावला तर नेमकं त्यांचच ' स्वर गंगेच्या काठावरती वचन दिले तू मला' हे गाणं लागलं होतं. गाणं ऐकताना डोळे नकळत पाणावले. महाविद्यालयीन जीवनात जसे खोडकर विचार डोकवायचे तसाच एक विचार आताही मनात डोकावला की, सरोजिनीबाईंनी सहजीवनाच दिलेलं वचन मोडून ऐन उतारवयात सरांना एकटं टाकून न परतीच्या वाटेवर निघून गेल्या. तो विरह असह्य झाल्यामुळेच तर शांतपणे त्यांचा शोध घ्यायला बाईंच्याच वाटेवरून ते गेले का? काहीही असो वैद्य सर, त्यांच्या अलवार, हळुवार गीतांतून सगळ्यांच्या मनात राहतीलच पण आता या क्षणाला सर्वत्र शारदीय नवरात्रींचा उत्सव दरवळत असताना वैद्यसरांच्या रूपाने ऋजू स्वभावाचं, शांत शीतल वाणीतलं 'शरदाच चांदणं' हरवल्याची खल कशी विसरता येणार?

# संध्याकाळचं मळभ

--- इग्नेशियस डायस

आजची संध्याकाळ खूपच उदास होती. या उदास संध्यासमयी मी परसदारी निवांत बसून होतो. तिथे सायंकिरणांची साधी तिरीपसुद्धा पोहचू नये इतका सूर्य पश्चिमेला ढळलेला होता. साऱ्या वातावरणात हळूहळू उदास संध्यारंग पसरू लागले होते.

मी एक कादंबरी वाचत बसलो होतो. मात्र त्यातले शब्द काही केल्या डोक्यात जात नव्हते. वाचनात एकाग्रता साधता येत नव्हती. मन सैरावैरा धावत होते फक्त! अनेक नको असलेल्या विचार-भावनांची जळमटं मनात जमा होत होती. नको झालेल्या आठवणींची चलतचित्रं डोळ्यांसमोरून तरळून जात होती. अधूनमधून अशी अस्वस्थ संध्याकाळ माझ्या वाट्याला येतच असते. मी देखील हल्ली अशा कातरवेळेची वाटच पाहत असतो.

पुस्तकात मन लागेना म्हणून ते बंद केले. परसबागेकडे पाहिले. सारी परसबाग डोळयांत जमा करण्याचा प्रयत्न करू लागलो तर आख्खी परसबाग शोकाकुल वाटत होती. साऱ्या वातावरणातच मरगळ दाटून आली होती. ही अशी भयाण उदासी सगळीकडे का दाटून यावी बरं! की काळच उदासीचं पांघरून घेवून प्रवासाला निघालाय! बरं, त्यात मी एकटाच ह्या उदासीचा धनी आहे अशातला भाग नाही. माझ्यासोबत माझी परसबाग, दूरवरचं चिंचेचं झाड, समोरचं मोठं घर, मध्येच शांततेचा भंग करणारं चिमण्या-पाखरांचं किलबिलनं, त्यांच्या उंडारण्याने होणारा पंखरव, पिल्लांना आपल्या सावलीच्या परिघाआत सामावून घेत किडे-मुंग्या टिपणारी कोंबडी, पुढचे दोन पाय लांब पसरवत त्यावर आपली मानगुट टाकलेला कुत्रा इतके सारेजण त्या उदासीवर आपला हक्क संगत आहेत असं मला वाटलं.

त्याचवेळी या सगळयांपासून आपलं एक वेगळंच अस्तित्व दाखविणारी निस्तब्ध शांततादेखील त्या वातावरणात उपस्थित होती. आणि ही शांततादेखील किती विलक्षण! जणू भग्न होण्यासाठी उत्सुक असलेली शांतता! आता नगारा वाजवला जाणार आहे, नगारावादकाने आपले हात वर उंचावले आहेत, त्याचे हात अवकाशात अधांतरी लोंबकळत खाली नागऱ्याच्या दिशेने सरकत आहेत, नेमकी त्यावेळी जी शांतता निर्माण होईल अगदी तशीच शांतता आता निर्माण झाली होती.

सारेच अद्भुत मनाचे खेळ म्हणून मी उठलो. बागेत शिरलो. परसबागेत फारशी झाडं नाहीतच माझ्या. दोन-चार नारळाची झाडं, एक कडूनिंब, आणि एक-दोन फूलझाडं बस्स! त्या झाडांना वाढविण्यात, त्यांचं शिंपण करण्यात, माझा वाटा किती? असा प्रश्न माझ्या मनात अधूनमधून डोकावतो आणि पाठोपाठ ‘काहीच नाही’ असं उत्तरही येतं. मी त्या फूलझाडांवरून कधी मायेचा हात नाहीच फिरवला, त्यांच्या बुडाशी कधी खत-पाणी नाहीच केलं आणि एरवी मला त्याबद्दल काही वाईटही वाटत नाही. पण अशा कातरवेळी जेव्हा सारी परसबाग माझ्या डोळ्यांतून पार हृदयात उतरते, माझ्याशी समरसून जात ती झाडं सुद्धा जेव्हा उदास होतात तेव्हा मात्र एक अपारधीपणा माझ्या हृदयाला बोचतोच!

अर्थात ही परसबाग फुलविण्यात मी माझ्या बाजूने हयगय का केली ह्या प्रश्नाचं ठोस उत्तर माझ्याकडे आहेच. ते असं, ‘झाडांना वाढविण्यात, माणसाने आपली ऊर्जा खर्ची घालण्याची काय गरज? त्यांना हवं ते पोषण धरतीच्या पोटातून मिळतंच की! तेव्हा त्या झाडांना पाणी घालून वर आपण किती निसर्गप्रेमी म्हणून मिरवण्यात काही अर्थच नाही. त्यापेक्षा आपल्या सोयीसाठी म्हणून माणसाने वाढलेली, मुळावलेली झाडं तोडू नये हे महत्वाचं!’ त्या

थंडगार, भुसभुशीत मातीवरुण अनवाणी चालता चालता मी मनातल्या मनात हे माझंच सामर्थन करीत असलेलं वरील लिबलिबीत दुबळं अवतरण घोकत होतो आणि माझं हे दुबळं समर्थन वारंवार परतवून लावत माझं हृदय अधिकाधिक अपारधीपणाकडे झुकत चाललं होतं.

बागेत फार काळ रेंगाळल्यासारखं वाटलं म्हणून तसा मी घरात शिरलो. अशा कातरवेळी मारवा ऐकावा असं कुणीतरी सांगितल्याचं आठवलं म्हणून मग रशीद खानचा मारवा लावला व तसाच निवांत बसलो. पण त्या रागदारीतला एकही स्वर माझ्या कानात शिरत नव्हता. कुठलासा ध्वनी अडथळयाविना माझ्या कानावर आदळत होतं फक्त! मीदेखील मग जाणीवपूर्वक ऐकावं असं न करता नुसताच बसून राहिलो.

पुन्हा एकदा आठवणींची चलतचित्रे माझ्या डोळ्यांसमोरून सरकू लागली. मला माझ्या बालपणीची संध्याकाळ आठवत होती. आताची ही संध्याकाळ कितीही सलणारी असली तरी माझ्या बालपणी मी जी संध्याकाळ अनुभवायचो त्यामुळे आजही गदगदायला होते.

जुनी मोठाली लाकडाची घरं, घराच्या आतील सगळ्या भिंती कुडाच्या. समोरच्या दारापासून पुढे मधोमध लांबलचक पसरलेली ओसरी. दोन्ही बाजूला खोल्या. घराची जमीन शेणाने सारवलेली, कुड शेणाने लिंपलेले त्यामुळे घरभर शेणाचा तो ओलसर नाकाला जड वाटेलसा वास भरून राहायचा. अशा या मोठ्या घरात काळोख कायमचा वस्तीला आलेला. छपरातून सूर्याची तिरीप आत येईल असा एक झरोका जरी ठेवलेला असला तरी साऱ्या घरभर कोपऱ्याकोपऱ्यात दाराच्या खोपात, स्वयंपाकघरात सगळीकडे काळोखाचे तुकडे अडकून पडलेले. हाच घराच्या ओसरीत अडकलेला काळोख संध्यासमयी मनाला कातर करीत असे. संपूर्ण दिवस अंगावरून गेल्यामुळे संध्याकाळी ग्लानी आल्यागत ते मोठं घर खांदे पाडून बसून राही. दिवेलागण होण्यास बराच अवधी बाकी असे आणि घरात अडकून पडलेला काळोख तर मी म्हणे अशावेळी मग माझ्या मनाची प्रचंड द्विधा होत असे. 'आता या काळोखाचीच कास धरावी, की दिवे लावून प्रकाशाची सोबत घ्यावी ह्या दोन्हींपैकी काहीही करणे मला निव्वळ अशक्य होवून जाई.

आम्हा मुलांची अख्खी दुपार खेळून झालेली असते. त्यामुळे संध्याकाळच्या वेळी प्रत्येक जन आपआपल्या घरी गेलेला असे आणि मला तर घरी थांबून राहणं खूपच कठीण जात असे. गोठ्यातुन पाड्डीचं जोराने हंबरण चालू असे. आई गुरांसाठी चारा आणण्यासाठी रानात गेलेली असे, आजी गोठ्यात म्हशींना पाणी पाजत असे आणि आजोबा त्यांच्या कामात ग्रस्त. अशाप्रकारे जो तो आपापल्या कामात गुंतलेला असताना मी प्रचंड एकाकीपणा महसुस करून राही. माझ्या मनाची अगदी सैरभैर अवस्था होत असे. कश्याकश्यात म्हणून लक्ष लागत नसे. अशा वेळी मग मी कौलांच्या फटीतून ओटीवर पडलेल्या सूर्यकिरणांच्या झुबक्यांशी खेळत बसे. ते अंड्यासारखे गोल ऊन जमिनीवर सांडलेलं असे अन मी ते उन्हाचं अंडं मुठीत पकडण्याचा प्रयत्न करीत असे. मात्र ते निसरडं ऊन माझ्या हातातून निसटून पुन्हा बाहेर पडत असे. मग मी दुसऱ्या हाताने पुन्हा त्याच्या दिशेने झेप घ्यायची व त्याने पुन्हा एकदा मुठीबाहेर पडायचे असा आमचा लपंडाव बराच वेळ सुरू राही. हळू हळू ते उन्हाचं अंडं नाहीसं होवून जाई. अगदी कुक्कुलं बाळ होवून त्या उन्हाबरोबर खेळता- खेळता मी त्या अस्वस्थ संध्याकाळचं मळभ हमखास झटकून टाकत असे.

त्या वेळची संध्याकाळ ही अशी छोट्या छोट्या गोष्टींमुळे यादगार होत असे. आजची उदास संध्याकाळ मात्र झटकून टाकणे मला शक्य होत नाहीये. पूर्वीसारखी घरं नसल्याने घरात उन्हाचा साधा कवडसासुद्धा पोहचत नाहीये आणि तरीदेखील काळोखाचा कुठेच पत्ता नाही. सगळीकडे उजेडच उजेड! हा कृत्रिम उजेड तर मला अधिकच नॉस्टॅल्जिक बनवत आहे. आणि माझ्या मनात पुन्हा पुन्हा ही गझल रुंझी घालत आहे.

'ये दौलत भी ले लो, ये शोहरत भी ले लो;
भले छिनलो मुझसे मेरी जवानी, मगर मुझाको लौटादो;
बचपण का सावन, वो कागज की कशती वो बारीश का पाणी.'

# नवा नाताळ

**--- बेर्नादेत रूमाव, बोरीवली**

जॉन अंकलने त्या कोपऱ्यावर नजर फिरवली, नेहमीच्या त्या जागेवर रोझा नव्हती. थरथरत्या हाताने आणि अधू नजरेने त्याने किचनमध्ये डोकावून पाहीले तर किचनच्या ओट्याजवळ ऊभी राहून रोझा दूध गरम करत होती. ते पाहून जॉन अंकलला बरं वाटलं. ' येतेस का?' हा रोजचा प्रश्न त्याने मग विचारला नाही.

रोझाची ती ठरलेली. तिची आवडती जागा होती. नाहीतरी घराचा एखादा कोपरा आपला विशेष आवडीचा असतोच ना! रोझाने हॉलजवळच्या या खिडकीची निवड केली होती. दिवसाच्या कोणत्याही प्रहरी ती तिथे बसलेली असायची. तिची तेथे बसण्याचीही एक पध्दत होती. खिडकीच्या त्या कोपऱ्यात तिचा हक्काचा एक स्टूल होता. त्यावर खिडकीशी लघुकोन करून ती बसायची त्यामुळे दोन गोष्टी साध्य होत असत. अधूनमधून घरभर तिची नजर फिरत राहायची व त्याचबरोबर खिडकीबाहेरील छोट्या जगातील सारं काही तिला दिसायचं.

आताही खिडकीशेजारच्या त्या छोट्या स्टुलवर रोझाचा भला थोरला देह विसावला होता. ती जागा म्हणजे तिच्या विरंगुळयाचे साधन होते. अख्खा दिवस ती तिथे बसून राहायची व रस्त्यावरून जाणारी येणारी वाहनांची, माणसांची वर्दळ निरखत राहायची. शाळा कॉलेजला जाणाऱ्या मुलांमुलींची दंगामस्ती, किंचाळणे-ओरडणे, आकाशातून ऊडणारी पाखरं केबलवायरच्या झुल्यात बसून झोके घेणारे रावे, बुलबुल, शेजारच्या गुलमोहरावरून बदामीवर सतत ऊड्या मारत पाठशिवणीचा खेळ खेळत तुरूतुरू पळणाऱ्या खारूताई हे सारे तिच्या जगण्याचे भाग होते. तिच्या दिवसभराच्या विरंगुळयाची ती साधने होती.

' येतेस का? जरा बाहेर पडू. बिल्डिंगभोवती दोन चकरा मारू. तेवढेच पाय जरा मोकळे होतील.' असं सारखं बोलून जॉन आता कंटाळला होता. सुरूवाती सुरूवातीला जॉन रोझाला जाता येता म्हणायचा. तसे त्यालाही ठाऊक झाले होते की रोझा काही तिची मुळ हक्काची जागा सोडणार नाही. बाहेर पडणार नाही. तीस-बत्तीस वर्षाच्या सहजीवनानंतर आता तर जॉनची खात्री पटली होती. तिचे वाढते वजन हे त्यांच्या चिंतेचे एक कारण बनले होते. ...रोझा वर्षातून केवळ दोनदाच घराबाहेर पडायची. एकदा ईस्टरच्या व एकदा ख्रिस्मसच्या मिस्सासाठी... तेही रिक्षांतून. रोझाच्या या कमी हालचालीमुळे तिचा देह असा अस्ताव्यस्त पसरला होता की स्थूल देहामुळे ती बाहेर पडत नव्हती हा जर तरचा प्रश्न आता ऊरला नव्हता.

आखाती देशात उमेदीची वर्षे घालवून जॉन मायदेशी आला. तोही रोझाच्या आग्रहाखातर. येथे परत आल्यावर त्याने एका गॅरेजमध्ये नोकरी धरली. ऊतार वयात त्यांच्यावर देवाची कृपा झाली. दोन मुलं झाली. हाडाची काडं करून त्यांनी मुलामुलीला निगुतीने वाढवले. पण अर्धवट शिक्षण, यथातथा नोकरीमुळे दोघांची लग्ने ऊरकता ऊरकता जॉन रोझाच्या नाकी नऊ आले. लग्न होईपर्यंत चाळीशी ठेपली.

जॉन अंकल आता वयानुरूप थकले व हळूहळू ओणवे होऊ लागले. आता तर काय जॉनच्या शरीरावर पार्किंसनचा विळखा पडला होता. एक अवयवाचा ताबा पार्किंसन्सने घेतला होता. हालचाली मंदावल्या होत्या. तरी होता होईस्तोवर जॉन शरीर हलतं ठेवण्याचा प्रयत्न करत होते. घरातल्या घरात वॉकरच्या आधाराने ते फिरत राहत. संध्याकाळी झाली की इमारतीभोवती एक दोन फेऱ्या मारत. कितीही वेळ लागला तरी जॉन अंकल काठीचा, जिन्याचा आधार घेत खाली ऊतरत असत. जाणाऱ्या येणाऱ्या हात हलवत. प्रत्येकाकडे त्यांची एकच मागणी असे. 'please Pray for me.' देवाकडे त्याचे फक्त एकच मागणं होते, 'देवा, सगळं काही तुझ्या इच्छेनुसार होऊ दे. पण मला शेवटपर्यंत चालतं बोलतं ठेव. बाकी काही नको.'

जॉन अंकलच्या दोन्ही मुलामुलींची लग्नं आपल्या ऐपतीप्रमाणे लावून दिली. सुरुवातीची काही वर्षे म्हातारी म्हाताऱ्याची आशेने वाट पाहण्यात गेली. आणि मग जस जशी वर्षे सरू लागली तशा दोघांच्या आशा मावळून गेल्या. ना मुलीच्या पदरात काही पडलं ना मुलाच्या. दोन्हीकडे पाळणा हलला नाही. क्वचित घराबाहेर पडणारी रोझा मग अधिकच घुमी झाली. अवतीभवतीच्या स्त्रियांची सुखं पाहून खंतावू लागली. खिडकीत जास्त वेळ बसून दिवस घालवू लागली. रोझा-जॉनची म्हातारपणी नातवंडांना मांडीवर खेळवण्याची हौस राहून गेली. तरीही जॉन अंकलने आशा सोडली नाही. त्याने कधी देवावर राग धरला नाही. मरियेवरचा विश्वास ढळू दिला नाही. दरवर्षी बाळ येशूचा गोठा तयार करण्याचे आपले व्रत सोडले नाही. ख्रिस्मस काळात लोकांना, पै-पाहुण्या घरी बोलावून प्रार्थना, कॅरल, आराधना करण्याची रीत सोडली नाही.

' काय दिलंय देवाने आपल्याला ? ना धड नोकरी दिली... ना वेळेत मुलं दिली...कसलं सुख दिलं देवाने ? म्हातारपणात मुलं दिली...तीही कुचकामी निघाली...मुलांनी तरी काय दिलं आपल्याला...आणि म्हणे देव...'गप्प गप्प राहणाऱ्या रोझाच्या तोंडाचा पट्टा एकदा का सुटला की ती देवाला दुषणे देत राहायची.

' रोझा, असं बोलू नये. देवाने जे जे दिलंय त्याबद्दल आनंद मान. देवाच्या योजना माणसाच्या योजनाहून भिन्न असतात. यावर तू का विश्वास ठेवत नाहीस.'अधनं मधनं दोघा म्हाताऱ्यात देवावरून असे खटके ऊडत पण प्रेमळ जॉन रोझाची अशी समजूत काढी.मग तीही शांत होऊन खिडकी बाहेर डोकावत राही.पण पुर्वी ऊत्साहाने गोठा बनवायला मदत करणाऱ्या रोझाने मागील काही वर्षापासून सोडून दिले होते.

आताही इमारती भोवती फेरफटका मारून वर जॉन अंकल वर आले होते.साऱ्या कॉलनीभर ख्रिस्मसचा माहौल होता. पण जॉन अंकलच्या घर नेहमी प्रमाणे जैसे थे होते. मह लहान मुलाच्या उत्साहाने जॉन अंकल जमेल तसा गोठा तयार करण्यात गुंतले. सकाळी घराबाहेर पडलेला त्याचा मुलगा जेसन व सून मरिया अजूनही आले नव्हते. जॉनचे कान त्याच्या येण्याचे वेध घेत होते.

निर्विकार मनाने रोझा रस्त्यावरील रहदारी निरखत होती. मध्येच नवऱ्याच्या मर्यादीत हालचाली पाहत होती. जॉनमधील बालसुलभ उत्साहाचे तिला भारी कौतुक वाटत होते. एवढ्यात इमारतीच्या गेटवर रिक्षा थांबली. त्यातून आधी जेसन खाली ऊतरला .त्याच्या हातात बरचं सामान होते. त्याच्या पाठोपाठ मरिया खाली ऊतरली. तिच्या हातात छोटं बांधलेले मुटकुळं होते. ते पाहून रोझाला नवल वाटलं. धडपडत ती स्टुलवरून ऊठली व जॉनला म्हणाली.' अरे जॉन, जॉन इकडे ये. ते बघ खाली जेसन मरिया आले आहेत. आणि मरियेच्या हातात बघ ना, काय आहे?... त्याच्या हातात बाळ आहे... कुणाचं आहे रे...! तुला काही माहित आहे का? ते दोघे काही बोलले नाहीत आपल्याला... की ते असं बाळ आणणार आहेत म्हणून... आंनद व दुःखाच्या संमिश्र भावनांनी रोझा फार गोंधळून गेली. पण जॉन अंकल नेहमी प्रमाणे शांत, स्थिर होते.

'त्या दोघांना तुला सरप्राईज द्यायचे होते. माझ्याशी या विषयावर जेसन बोलला होता.'

'मग तुम्ही का नाही सांगितले मला?'

'वा... मग ते सरप्राईज कसे राहिले असते. ते बाळ मरियेच्या एका मैत्रिणीचे आहे.... अचानक राहिलेले... गडबड झालेलं... तिसरे बाळ... तिला नको असलेले.... आणि आपल्या मरिया जेसनला हवं असलेलं.....'

' आणि आपल्या दोघांना सुध्दा हवं असलेले... खरं ना जॉन....' 'हो. अगदी खरं...'

' मग त्याच्यात काही बोलणं झालं.' आणि...आज नाताळच्या शुभमुहूर्तावर बाळ आपल्या घरी येत आहे.' जॉन अंकलचे बोलणं संपेपर्यत दारावरची बेल वाजली. आणि लगबगीने रोझा दारापर्यंत धावत गेली.

आपल्या आत नवा उत्साह संचारल्याची रोझाला नव्याने जाणीव झाली. सुहास्य वदनाने तिने जेसन मरियाचे स्वागत केले व बाळाला आपल्या कवेत ओढून घेतले

'परमेश्वराच्या योजना खरंच भिन्न असतात. जॉन, तू बरोबर म्हणाला होतास. यंदाचा नाताळ खरंच सुंदर व वेगळा आहे.' बाळाचा गालगुच्चा घेत रोझा म्हणाली. जॉन अंकल आपल्या थरथरत्या हातांनी गोठा तयार करण्यात गढून गेले.

# आपले शिक्षण...

**--- फ्रान्सिस आल्मेडा, निर्मळ.**

**१) शिक्षण म्हणजे काय?**

ज्याने माणूस बदलतो, कुटुंब बदलते, समाज बदलतो, देश बदलतो आणि सारे जग बदलते ते शिक्षण! शिक्षण म्हणजे तुमच्या विचारावर आणि आचारावर केलेला संस्कार जो मानवाला तिमिरातून तेजाकडे नेतो, असत्याकडून सत्याकडे आणि मरणातून अमरत्वाकडे नेतो.

स्वातंत्र्यानंतर नेमलेल्या कोठारी आयोगाने म्हटले आहे आपल्या देशाचे भवितव्य शाळेच्या वर्गातील खोल्यातून घडते. कोठारी कमिशनच्या किती योजना प्रत्यक्षात उतरल्या हा संशोधनाचा विषय आहे. शाळेच्या वर्गातील खोल्यातून देशाचे भवितव्य खरेच घडते आहे का?

आपण आपले सगळे शिक्षण लेखी परीक्षा व गुण याच्या दावणीला बांधले आहे. लेखी परीक्षा मुख्यत्वे पाठांतर व स्मरणशक्ती यावर आधारीत आहेत. एकेका गुणासाठी स्पर्धा व त्यासाठी विविध प्रकारच्या भ्रष्ट मार्गाचा आधार! शिक्षण म्हणजे परीक्षा देऊन मिळणारे सर्टिफिकेट व त्या आधारे मिळणारे पुढील प्रवेश! त्यातून पुढे व्यवसायिक शिक्षण, नोकरी-व्यवसाय, लग्न, संसार.... संपत्ती व भौतिक सुख या मागे धावणारा एक रोबोट!

आपला विद्यार्थी अनेक विषयाचा अभ्यास करतो पण परीक्षा झाल्यावर सगळे विसरून जातो. भाषा, इतिहास, भूगोल, विज्ञान आणि गणित सगळे विषय शिकून एकाही विषयाचा संस्कार, दृष्टी व कौशल्य यापैकी काहीही त्याच्या पदरात पडत नाही. भाषा शिकून वाचनाची आवड तरी यायला हवी, भूगोल शिकून त्याला पृथ्वी गोल असून ती स्वतःभोवती व सूर्याभोवती फिरते म्हणजे काय ही साधी गोष्ट समजलेली नसते. विज्ञान शिकून अंधश्रद्धा अढळ असतात, चमत्काराला नमस्कार होत असतात! गणित व्यवहारात वापरता येत नाही.

यासाठी सर्वात जास्त दोष मुलांना दिला जातो पण परिस्थिती उलट असते. सर्वात कमी दोष मुलांचा असतो! मुले पालकांची गुलाम, पालक शिक्षक व शाळेचे गुलाम, शाळा शिक्षण खात्याच्या व शिक्षण खाते सरकारचे गुलाम! सरकारमधील मंत्री सांगणार ते शिक्षण! सरकारने नेमलेल्या शिक्षणतज्ज्ञानी तयार केलेली पाठ्यपुस्तके व अभ्यासक्रम हे सर्व गुलाम राबवणार!

शिक्षणाच्या केंद्रस्थानी विद्यार्थी पाहिजे असे नामवंत मानस शास्त्रज्ञ व शिक्षण तज्ज्ञ सांगतात पण आपल्या शिक्षणाच्या केंद्रस्थानी आहे केंद्रसरकार! केंद्रसरकार नवनवीन विषय व योजना आणते आणि देशातील सर्व त्यांच्या दावणीचे गुलाम ती राबवतात!

हा शिक्षणाचा सर्व पिरॅमिड उलट व्हायला पाहिजे. विद्यार्थापासून सुरूवात करायला हवी. प्रकाश आमटेच्या गडचिरोलितील शाळेत शिक्षक प्रथम मुलांची माडिया भाषा शिकतात. त्यातून त्यांच्याशी संवाद साधतात, मग हळूहळू मराठी भाषा शिकवतात. असे देशभर विद्यार्थीकेंद्री शिक्षणाचे प्रयोग खाजगी पातळीवर सुरू आहेत त्यांना बळ मिळविण्यासाठी समाजमन तयार व्हायला हवे. शासनाच्या गुलामगिरीतून शिक्षण मुक्त झाले तरच देश खऱ्या अर्थाने स्वतंत्र होईल!

ही सर्व गुलामगिरी पालकांनी मुलांवर लादली तर त्यातून नैराश्य, वैफल्य व आत्महत्या या दिशेने मुलांचा प्रवास सुरू होतो. तो आपल्यापुरता थांबवायचा असेल तर मुलांना स्पर्धेचे घोडे न बनवता त्यांना जे शक्य असेल व

आवडेल ते शिकू द्या. पास नापास व गुणाचे टक्के या पेक्षा आपल्या संस्कारातून त्याला घडवू या आणि खरे संस्कार त्यांच्यावर निरपेक्ष प्रेम करूनच करता येतात हे लक्षात ठेवू या!

## २) **ट्युशन मुक्तीसाठी**

आपली शिक्षण पद्धती शिक्षण संस्था व ट्र्युशनचे क्लासेस अशा दोन स्तरावर चालते. एक शासन अधिकृत तर दुसरा अनधिकृत, एक शासकीय सवलतीत तर दुसरा पालकांच्या खैरातीत! या दोहोच्या चक्रात कोवळया बालकांची प्रचंड अमानुष पिळवणूक! कशासाठी हे सर्व? पालक म्हणतात आमची मुले जीवघेण्या स्पर्धेत टिकली पाहिजेत. त्यांना उत्तम करीयर करता आले पाहिजे!

उत्तम करीयर म्हणजे काम कमी आणि भरपुर उत्पन्नाची हमी! डॉक्टर, वकील, इंजिनीअर, सीए, एम्बीए वगैरे वगैरे.... त्यासाठी चांगल्या संस्थेत प्रवेश, प्रवेशासाठी चांगले गुण, चांगल्या गुणासाठी चांगले मार्गदर्शन म्हणजे ट्र्युशन! केजी पासून पीजी (पोस्ट ग्रेज्युएट) पर्यंत आपला घोडा कोठेही मागे पडता कामा नये! हे मोठे चक्रव्युह आहे! बालक, पालक, शिक्षक सगळे या चक्रव्युहाचे शिलेदार! आपण गुलाम असल्याचे कोणालाही भान नाही आणि तशी जाण देणाऱ्याना मान नाही. शासनाला सर्व आपल्या हातात ठेवायचे आहे. त्यांना प्रश्न विचारणारा विवेकी नागरिक नको आहे. भौतिक सुखामागे धावणारा गुलाम हवा आहे म्हणजे लोकशाहीची झुंडशाही बनवणे सोपे होते. आपल्या लोकांना घेऊन या झुंडींना लढत ठेवून सुखाने शासन करता येते!
त्यासाठी शासन नवनवे विषय अभ्यासात आणते. गुणांची गुणवत्ता, टक्केवारीची स्पर्धा यात बालक, पालक व शिक्षक यांना पुरते झुंपून ठेवले की सुशासन निवांत होते! शिक्षणासाठी किमान खर्च करून कमाल फायदा करून घेतला जातो! ट्र्युशन ही आपल्या शिक्षण पद्धतीत असलेल्या दोषावर समाजाने केलेली उपाय योजना आहे. परीक्षेतील गुणावर सर्व ठरणार असेल तर गुण वाढवण्याची योजना शिक्षण संस्थाकडे असायला हवी, ती नसेल तर लोक दुसरा मार्गदर्शक शोधणार! उच्च शिक्षण देणाऱ्या आयआयटी सारख्या संस्थेत प्रवेशासाठी तयार करण्याची व्यवस्था शिक्षणसंस्थाकडे नसेल तर त्यासाठी खाजगी क्लासेस निघणार आणि लोक तेथे जाणार! म्हणजे आजार आपल्या व्यवस्थेचा आहे, उपाय तेथे करायला पाहिजे!
यावर उपाय काय? शासन ट्र्युशन क्लासेसवर बंदी आणण्याचा आव आणते. रोगाच्या मुलभूत कारणांचा शोध घेऊन त्यावर उपाययोजना करण्या ऐवजी लक्षणावर औषध देण्याचा हा प्रकार आहे! पहिली गोष्ट प्राथिमकतेची! देशात सर्वाधिक महत्वाची गोष्ट म्हणजे शिक्षण आहे हे आपल्या लोकांना, विचारवंताना व शासनाला पटले पाहिजे! विद्यार्थी शिकतात चांगल्या शिक्षकांकडून ,त्यांची गुणवत्ता, बांधीलकी आणि संख्या वाढवली पाहिजे. शिक्षकांची गुणवत्ता वाढवली की शाळांची गुणवत्ता वाढेल. शाळा, कॉलजेही परीक्षाकेंद्रे न होता ज्ञानकेंद्रे झाली पाहिजेत! त्यासाठी शिक्षकांना हवी दिशा, विषयाचे व बालमनोविज्ञानाचे प्रभुत्व आणि सर्वात महत्वाची स्वायत्ता! वरून खाली नियंत्रण करणाऱ्या सध्याच्या शिक्षण पद्धतीत हे अशक्य आहे!
हा चक्रव्युह भेदने शक्य नाही का? पालकांच्या प्रबोधनाने काही साधेल का? शिक्षण संस्था काही मार्गदर्शन करू शकतात का? शासनाला बदल करायला भाग पाडता येईल का?
विचार करायला तर सुरूवात करूया!

# आशीर्वाद

**--- सायमन रॉड्रिग्ज, आगाशी**

जानुबायशा मयताला जेमतेम ६०/७० लोक हॉता ... कुना रडना नाय.. गा कुना हाको मारना नाय... वय पन बरा ८०आ वर हॉता... आन शेवटशे तीन शार वहरे शिकपानातूस गेले....

जानू ... ज्या दिहा जाली ती आपल्या बयला मारॉनुस... बाळंतपनात जानूयी बय मेली आन जानुआ हालाला सुरवात जाली... लानपनी जानूला मामर शा बयनॅ बाळगीला... आन मामरशी बय जही मेली तही हवतार आयशा हाथाखाला आठ वहरायी जानू जहनी मोलकरीन भगुन आली... तिगाळशा टायमाला पोऱ्यो शाळा शिक्षान करीत नोत्यो... त्यामुळॅ जानू हाकाळ हांज भाट, भयी, हेंनडोळ आन मंग बावींसॉ पानी काड्यासॉ... पानी तापव्यासॉ आन हवतार बाहाशी आंगोळ, शी सू काडना यातुस तीऑ दी जासॉ. बाबा तॅ भाटात खप्यासॉ आन हांसॉ बक्काट प्यासॉ... त्यामुळॅ जानूआ आहा कुनूस नॉता...

जानू दिख्या बरी होती... पन घरशी गरीब परिस्थिती... बाप दारुडॉ आन हवतार आय आन तिगाळशा सालीरीती प्रमानॅ वयाशा सॉळाव्या वहरा पोऱ्यो वराड्याश्यो पन जानू आ लग्नाऑ विसार कऱ्यादोस कुन नॉता आन अह्या वॅळॅला जानूला एका भॉट्या घरसॉ निरोप आलॉ. पोरीआ नशीब बरा आहा समजॉन जानू भॉट्या घरशी ऑ बाय जाली... वराड जाल्यानंतर थॉड्यास दिहामिनॅ जानूला समजाला कि तीऑ नवरॉ वॅडॉ हाय आन पूर्न पुरुष नाय... भॉट्या घरसॉ मनून तॉ वराडलॅ, बाकी त्याला लगीन, संसार, शरीरसुख यी कयीस मयीत नाय आन जमॅ नाय... भॉठॉ भावलॉ आन त्याये पोरे, हाऊ हरॉ , नल्दोयो या सगळ्यांना एक आयती मोलकरीण मिळाली... जानू जावॉन कडॅ जाशी? दुख हांग्यासा कुनाला? ... बिचारी तहॅस दी काडीत गेली... जानू पॉटापटी कय हॉयाशी शक्यता पन नोती आन समाजामीनॅ वांझ मनून ती गनली गेली... पंधरा वहरा नंतर एक दी अचानक जानुऑ नवरॉ फिट यॅवॉन मॅलॉ... जानू विधवा जाली...

वहरॅ भरात गेले... जानूआ भावल्यायॅ पोरे भोटे जाले... जानू ला घारामीनॅ एक खोली आन त्यातूस तीऑ संसार... जमीन जमलॉ खूप हॉतॉ... खार विकली... लाखो रुपय आलॅ... जानूला कुनॅ दमडी पन नाय दावडली... पॉरांना घरे बांद्याशे जाले आन जानूयी त्यांना अडचन हॉया लागली... तीआ वाट्याआ कुनूस नॉता... आन एक दी जानुयी रवानगी वृध्दाश्रमात जाली... अर्ध्या हिश्श्यायी मालकीन भिखाऱ्या हारकी तीई अवस्था जाली...

जानूऑ हवतार भाहा ... ज्या तीनॅ खूप कॅलता जानूला मीनॅ मीनॅ बगीत यासॉ... तॉ पन बिचारॉ अचानक मॅलॉ... त्या पॉर मात्र मीनॅ मीनॅ जानूला बगीत यासॉ... जिगाळा त्याला समाजाला कि जानुबाय ला वृध्दाश्रमात ठोयलॅ तीगाळा त्यानॅ तडॅ जाऑन जानुबायला आपल्या घारा हाडला... मॉडका घर, तुटकॉ संसार ...पन आपल्या बाय सॉ अडॅ हिसॉ हाय आन तीआ कुनूस नाय आहा समजॉन तॉ आन त्या बायकू पोरे तीयी सेवा कऱ्या लागले...

यथावकाश जानू आ भावल्या पॉराये भॉठॅ भॉठॅ बंगलॅ जालॅ, गाड्यो आल्यो आन अडॅ अचानक जानूऑ भासॉ देवाघारा गॅलॉ... पन त्या बायकुनॅ हिम्मत हारली नाय... पॉरानॅ मेहनतीनॅ शिक्षण करॉन नोकरी धरली आन पुडॅ कारखानॉ सालू कॅलॉ...

शेवटशे २/३ वहरे जानूये शिकपनात गेले... पन भाशा बायकुनॅ, पॉरानॅ आन नवीन आलेल्या ऑ बायनॅ पन जानुबायशी खूप सेवा केली....

शेवटशा क्षणाला जानुबाय ती भाशा बायकुला (ऑ बाय ला) बोयली ... "पोरे ... मा आशीर्वाद हाय... तू पॉर खूप भॉठॉ हॉयदॅ... तुमश्या दहा पिढींना खप्यासा नाय ऑडा तॉ कमावीदॅ....

जानुबायला शांत मरान आला....

आज जानुबायशा भावल्या पोरां एक पॉर वयाशा विसाव्या वहरा अचानक मॅलॉ... बी भाहाश्या पोरीनॅ ऐन जवानीत आत्महत्या केली... नवीन आलेल्या ऑबायांने हाऊ हरे वायलॅ काडलॅ....

आन जानुबायशा भाशा पॉराओ कारखानो जोरदार सललॅ... बंगलॉ, गाडी, प्रॉपर्टी खूप केले....

जानु बायश्या आशीर्वादानॅ त्या काम केला.

# बय

**--- सचिन मेंडीस**



बय म्हणजे आजी. लाल लुगड्यातली माउली. जणू मायेचं अंगण. 'बय' हा माझ्या लिखाणाचा नेहमीचा विषय. बयला पाहिले तर चार ओळी सहंज सुचतात इतकी बय लेखणीला भावून जाते. कधी लिहायला विषय नसला तर 'बय' मदतीला धावते. आज सहज फेरफटका मारत असताना बयचा प्रसन्न चेहरा समोर आला. क्षणभर थांबलो. बयच्या निर्मळ रुपाला डोळयात साठवून घेतलं. काय लिहावं ह्या बयविषयी? अनोळखी चेहरा तरीही कितीही जवळचा वाटणारा.

कधी जमलं तर आमच्या वसईला या.  मुंबईच्या वेशीबाहेरील निसर्गरम्य परिसर. तुमचं नशीब जर चांगल असेल तर कधीतरी हिरव्या बागायतीमध्ये आपल्या पवित्र ओंजळीने निसर्गाला समृद्ध करणारी बय दृष्टीस पडेल. अन खात्रीने बयच्या हव्या हव्याशा मायेच्या स्पर्शाने सुगंधित झालेली बाग आपलं मन हिरवं करीलं. असं हे विलोभनीय दृश्य आजकाल पाहायला मिळण तसं विरळचं. पण जेव्हा नजरेस पडतं तेव्हा मन भरून येतं. आयुष्य समृद्ध झाल्याचा भास होतो.

बयचे अनेक अनुभव आहेत. एक मुद्दामपणे इथे सांगावासा वाटतो. बयची आठवण आली कि माझं मन नेहमी उदास होतं. तिच्या मायेच्या स्पर्शासाठी जीव कासावीस होतो. मागे कित्येक दिवसात बयची भेट झाली नव्हती. मग वेळ काढून बयला भेटायला गेलो. बय ओटीवर हिंदोळयात बसलेली होती. तिला पाहताच माझ्या चेहऱ्यावर आनंदाचा मोरपिसारा फुलला. बयसुद्धा माझ्या ओढीने आसुसलेली होती. मला पाहताच तिच्या डोळयात चमक आली. मी ओटीच्या पायऱ्या चढत असतना बय उठून पुढे आली. वार्धक्याने ती कमरेत वाकली होती पण नेहमीप्रमाणे थकलेली जाणवली नाही. मी जवळ जाताच बयने मला मिठी मारली. त्या स्वर्गीय स्पर्शाने माझ्या अस्तित्वाला एक वेगळा गंध आला. किती मायेचा होता स्पर्श तिचा. अनमोल स्पर्श, जसं तिच प्रेम.  अनमोल, अलौकिक, जणू आभाळमाया.

बयशी मनोसोक्त गप्पा झाल्या अन निघताना मी सहज एक ५०० ची नोट बयच्या हातात टेकली. बयने झटकन माझा हात मागे केला अन म्हटलं 'मला नको, माझ्याकडे आहेत, काल नारळ विकले त्याचे ७०० रूपये मिळाले आहेत मला.' मी बयच्या डोळयात पाहिले अन मनोमन विचार करू लागलो, 'किती सुंदर बनवल्या आहेत ह्या 'बय' देवाने, वास्तल्याने ओतप्रोत भरलेल्या, कशाची तक्रार नाही कि काही मागणं नाही.

मी निघणार तो बय आत जाऊन आली अन म्हणाली 'माझं एक काम कर, आपल्या नात्यातील स्मिता बाळंत झाली आहे, तिला हे भेट दे.' मला काही कळण्याच्या आत बयने माझ्या हातात १०० रुपयाची नोट ठेवली. बयने नारळाच्या कमाईतील काही वाटा सत्कारणी लावला होता. मी गमतीने बयला विचारले, 'बय, नारळाचे पैसे तूझ्याकडे जास्त वेळ रहात नसावे.' माझ्या प्रश्नाने बय सुरेख हसली. क्षणभर प्राजक्ताचा सडा ओटीभर फुलून आला. बयने उत्तर दिलं, 'हे शेवटचे १०० उरले होते ते कारणी लागले'. मी बयकडे आश्चर्याने पाहिले. माझ्या मनात बयच्या खर्चाचा मागोवा घेण्याची उत्सुकता निर्माण झाली होती पण चंद्राच्या शीतलतेवर संदेह का असावा? नक्कीच हिने सवयीप्रमाणे दानधर्म केला असेल ह्याची मला कल्पना आली.

मी बयला मिठीत घेतले अन ओटीवरून खाली उतरलो. विचार करू लागलो. हिच्याकडे देण्यासारखे किती आहे. हीच आयुष्य देण्यातच गेलं. ना तिची माया कधी आटली ना कधी तिच्या बटव्यातले पैसे. अन आपली नवीन पिढी. फक्त घेण्याची वृत्ती. आपण सुगंध वाटत नाहीत म्हणून फ़ुलत नाही. फक्त आपल्यापुरताच उमलणे हे काय फुलंण झालं. बय वाटत राहिली सुगंध म्हणून फ़ुलत गेली. कोमेजणं तिच्या वाट्याला आलं नाही. घरी परतेपर्यंत बय अजून फ़ुलत गेली मनात अन तिचा सुगंध घरभर. 'किती सुंदर आहे आपली 'फुलराणी',  मी आईला म्हटलं. 'कोण फुलराणी? आई म्हणाली. मी हसत म्हटलं ' माझ्या आईची आई'. लाल लुगाड्यातील माऊली.

मित्रांनो, खरंच किती दशकांच ओझं घेऊन ही आजी इथपर्यंत आलीयं. न थकता, न थांबता, न तक्रार करता अख्खा समाज आपल्या उबदार मिठीत घेऊन बयचा अवर्णनीय प्रवास झालांय. एक चालताबोलता इतिहास,ज्या इतिहासात आनंदाचे क्षण कमी अन संघर्ष जास्त दडलांय. असा संघर्ष ज्या संघर्षाच्या पायावर एक सुशिक्षित अन संपन्न समाज उभा राहिलांय.

लहानपणापासून बयला आपण डोळयात जागवत आलोय. किती मुद्रा पाहिल्या असतील बयच्या आपण. लहान बाळाला मांडीवर उलट झोपवून आंघोळ घालणारी बय, विहिरीच्या बाजूला झावळया विणणारी बय, घराच्या पाठीमागे चुलीवर ठेवलेल्या पातेल्याखाली नारळाची साल घालणारी बय ते वाडीतून डोक्यावर भाजीपाला वाहून आणणारी बय. सतत वाहत असणारी. एक मात्र खंर. प्रत्येक मुद्रेत बयची ओळख जरी वेगळी असली तरीही ध्येय अन संघर्ष सारखांच असतो, आपल्या पिल्लाचा भविष्यकाळ उज्ज्वल करण्याचा. नाही का?  लोप पावत असलेला हिरवा गाव अन त्याही पेक्षा वेगात अदृश्य होणारी लाल लुगड्यातील प्रेमळ माय. एक काळी माती अन दुसरी जुनी नाती. शहर गावात घुसत असताना गावाच्या आयुष्याच्या सायंकाळी, दोघेही एकाच वेगाने काळाच्या पडद्याआड होत चाललेल्या. कुणास ठाऊक पुढे काय वाढून ठेवलं आहे त्यांच्या नशिबात. सरत्या कालानुरूप हरवत चाललेला हा अमुल्य ठेवा. डोळयासमोरून बघता बघता अदृश्य होऊन फक्त आठवण बनून न राहो.

# रियुनियन

--- **सॅबी परेरा, नानभाट**

व्हॉट्सअ‍ॅपचा एक ग्रुप बनतो. नावं आठवून, नंबर धुंडाळून एकेक शाळासोबती त्या ग्रुपमधे मेंबर म्हणून जोडले जातात. काहींचा शेवटपर्यंत पत्ता लागत नाही आणि काही मैत्रिणींचे नवरे एकविसाव्या शतकातही आपल्या बायकोचा मोबाईल नंबर तिच्या शाळासोबत्यांच्या हाती लागू देत नाहीत. ग्रुपमधे रिवाजाप्रमाणे गुड मॉर्निंग, गुड डे, हॅपी बर्थडे, मेसेज फॉरवर्ड केल्यावर होणारे चमत्कार, कॅन्सरवरील घरगुती इलाज अशा संदेशांचा रतीब सुरू होतो.

मग टूम निघते आपल्या दहावीच्या बॅचला अमुकतमुक वर्षे झाल्याबद्दल सर्व शाळूसोबत्यांचं एक स्नेहसंमेलन (म्हणजे पूर्वीचे Get-together, आताचं Reunion) घडवायचं. हा कल्पनेचा गोवर्धन, व्हॉट्सअ‍ॅपवरचे सगळेच गोप-गोपिका, अंगठ्यावर उचलून धरतात. उत्साही मंडळी कामाला लागतात. दिवस, जागा, वेळ, कार्यक्रमाची रूपरेषा, खाण्यापिण्याची व्यवस्था (गुपचूप पिण्याची व्यवस्था करणारा एक सब-ग्रुपही बनतो), वर्गणीची रक्कम,  फॅमिली आणली तर चालेल का वगैरे ठरत जातं. फायनली रियुनियनचा दिवस उजाडतो.

शाळा सोडल्यानंतरचं हे पहिलंच रियुनियन असेल तर उपस्थिती ब-यापैकी असते. रियुनियन केवळ निमित्त असते. उपस्थित असलेल्या बहतेकांचा एक छुपा अजेंडा असतो. कुणाला आपली नेतृत्वाची खाज भागवायची असते तर कुणाला वक्तृत्वाची. आपण किती पैसा कमावलाय हे कुणाला दाखवायचं असतं तर कुणाला आपण कमावलेली बॉडी दाखवायचं असते. आपण स्वत:ला स्लीम अँड ट्रीम मेंटेन करून अजूनही कशा सुंदर दिसतो हे कुणाला दाखवायचं असतं तर कुणाला आपल्या नव-याचं कर्तृत्व मिरवायचं असतं. अमुकाला नकार देऊन आपण चूक तर केली नाही ना हे अजमावण्यासाठी एखादी आलेली असते तर तुझ्या नकाराने माझं xxx वाकडं झालं नाही हे दाखवण्यासाठी एखादा धडपडत असतो. कुणाचं काही तर कुणाचं काही.

हळूहळू एकेक जण जमू लागतो. हाय... हॅलो.... कसं काय ... मजेत ! स्टँडर्ड प्रश्न अन् स्टँडर्ड ऊत्तरांचा सिससिला सुरू होतो तो दिवसभर सुरूच राहतो. अगदीच नाईलाज झाला तर पोराबाळांची आणि पोटापाण्यासाठी काय करता ह्याची जुजबी चौकशी होते. आपदधर्म म्हणून प्रश्न विचारले जातात, ऊत्तरं ऐकणं कधीच कंपलसरी नसतं.

मी शोधत राहतो, दहावीच्या वर्गात ज्यांना सोडून गेलो होतो ते मित्र-मैत्रिणी... आजूबाजूला, मागे-पुढे, जवळ-दूर, घोळक्यात, कोप-यात ... सगळीकडे शोधतो ... एकतरी हरवलेला सुहृद सापडावा.

पहिल्या बेंचवर बसणा-या, पहिला नंबर कधीच न सोडणा-या पवार सरांच्या बडबड्या प्रदीपला शोधतो, तो  कंपाऊंडच्या भिंतीआड गुपचूप सिगारेट फुंकत असतो. चौकशी करता त्याच्या व्यसनाधीनतेचे खूप किस्से कळतात. ITI करून सगळयात आधी नोकरीला लागलेला आणि आमचं कॉलेज व्हायच्या आत मोठ्या कंपनीत युनियन लिडर म्हणून नावारूपाला आलेला मित्र वाईट संगतीमुळे कफल्लक होऊन आज आलेलाच नसतो. शाळेत कुणाच्या खिजगणतीत नसलेला एकजण सरकारी नोकरी आणि LIC ची एजन्सीच्या जोरावर सगळयाना 'आयुष्यावर बोलू काही'चे धडे देत असतो. शाळेच्या दहा वर्षापैकी सरासरी ७०% काळ ज्याचा वर्गाबाहेर कोंबडा बनण्यात गेला तो इसम आज यशस्वी बिल्डर होऊन त्याने शिक्षकांसाठी गिफ्ट्स स्पॉन्सर केलेले असतात. शिक्षकाचा पेशा स्विकारलेल्या बहुतेक मुली (आणि काही बाप्येदेखील) हातातली अदृष्य छडी फिरवित हा रियुनियनचा वर्ग हाकण्याचा आव आणत असतात. नोकरी करणा-या आणि पूर्णवेळ गृहिणी झालेल्या मुली आपापल्या पेहरावावरून सहज ओळखू येतात.

मी रियुनियनला जातो तेव्हा मी शाळेत सोडलेले शाळासोबती आज २० - २५ वर्षानंतरदेखील भावनिकदृष्ट्या मी त्यांना जिथं सोडलं होतं तिथेच (माझ्यापासून तेव्हढ्याच जवळ किंवा लांब) असावेत अशी माझी अपेक्षा असते. बौध्दीकदृष्ट्या  मात्र त्यांची वाढ माझ्याइतकीच आणि माझ्या बौध्दीक वाढीच्या दिशेनेच व्हायला हवी असा माझा अट्टाहास असतो. आणि साहजिकच आहे की,  हे होणं शक्य नसतं. मग कुणाची राजकीय मतं मला तद्दन प्रतिगामी किंवा नको इतकी पुरोगामी वाटतात. कुणाचं धर्माला किंवा नशिबाला शरण जाणं मला रूचत नाही. एखाद्याची बडबड मला वात आणते, तर गपचूप राहणारा मला बोअरिंग वाटतो. ह्या भाऊगर्दीत एखाद-दुसरा जसा शाळेत होता अगदी तस्साच असतो पण तरीही मी त्याच्याशी कनेक्ट होऊ शकत नाही. कारण मी तस्साच राहिलेला नसतो. कुणी शाळेत घडलेले किंवा तेव्हा ऐकलेले किस्से, विनोद सांगून खळखळून हसतो अन् माझ्या चेह-यावरची रेघही हलत नाही.

ज्या मित्रांवाचून एकही दिवस राहता येणार नाही असं शाळेत असताना वाटत असतं, त्यांच्याशी वर्षानुवर्षे बोललं-भेटलं नाही तरीही आपलं काहीही अडलेलं नसतं. शाळेच्या, कॉलेजच्या, उमेदवारीच्या, नोकरीच्या, तरूणपणीच्या आयुष्याच्या विविध टप्प्यांवर आपल्या त्या त्या वेळच्या शारिरीक, मानसिक, भावनिक, बौध्दीक गरजांशी समकक्ष असणा-या व्यक्तींशी आपली मैत्री जुळते. जोवर आपल्या गरजा, आपल्या प्राथमिकता, आपली दु:खं सारखी असतात तोवर ती मैत्री टिकते आणि ती परिस्थिती बदलली की मैत्रीचा तो बंध ढिला पडू लागतो. कधी अदृष्य होतो तर कधी तूटतोदेखील.

माणूस जीवनात जरासा स्थिरस्थावर झाला की त्याला गतायुष्यातील तथाकथित सुखी दिवसाचे कढ येऊ लागतात. परत एकदा जुन्या मित्रमैत्रिणींना भेटावं, जुन्या दिवसाच्या आठवणीत रमावं, जमलं तर जुने दिवस जगून पहावं असं त्याला वाटू लागतं. ह्या रियुनियनच्या निमित्ताने तो प्रयत्न केला जातो पण तो नॉस्टॅल्जिया फार टिकत नाही. बालपणीच्या निष्पाप दोस्तांची जागा आता हिशेबी इसमांनी घेतलेली असते. डोळे झाकून तुम्ही कुणावर विश्वास टाकू शकत नाही, कुणी तुमच्यावर विश्वास टाकत नाही. जिथे सगळयाच विषयावर सगळयांचं एकमत व्हायचं तिथे आपल्या मताला विनाअट दुजोरा देणारा मिळता मिळत नाही.

समोर व्यासपीठावर भाषणं होत असतात, विनोद, कवितांचं सादरीकरण होत असतं, यांत्रिकीरत्या एकमेकांना हाय-हॅलो केलं जात असतं, हात मिळवले जात असतात, कुठेकुठे गळाभेटही होत असते, चहापान, जेवणं होतात. पुन्हा भेटायचे इरादे-वायदे केले जातात. रियनियनला येताना प्रत्येकजण

आपल्याभोवती एक अदृष्य कोष घेऊन आलेला असतो. अपवादात्मक कुणीतरी ठरवून या कोषातून बाहेर येतो, हृदयापासून बोलतो, मनापासून ऐकतो आणि ख-या रियुनियनचा आस्वाद घेतो बाकी सारे आपल्यासारख्याच कोषधारी शरीरांना भेटून, बोलून माघारी परतू लागतात.

मी रियुनियन वाया गेल्याच्या भावनेने खिन्न चेह-याने एकीकडे ऊभा असतो. एका बाजूला आपल्या मैत्रिणींच्या घोळक्यात ऊभी असलेली ती एक बुटकेली ललना मला पाहताच हात उंचावून, स्माईल करून 'हाय' करते आणि माझ्या दिशेने येऊ लागते. ही तीच मुलगी जिच्याशी शाळेच्या दहा वर्षात माझं एकदाही संभाषण झालं नव्हतं. आज ती स्वत:हून माझ्याजवळ येते. तब्येत, कुटुंब,नोकरी, मुलंबाळं असं काहीबाही सांगत राहते, विचारत राहते. जिच्याबरोबर बोलण्याचा, खेळण्याचा, भांडणाचा, अभ्यास करण्याचा, शिक्षा भोगण्याचा, हसण्याचा, रडण्याचा असा
कसलाच संबंध शाळेच्या दहा वर्षात आला नाही ती रोज भेटणा-या परममित्राच्या हक्काने भेटते. जणू काल बोलता बोलता अर्ध्यावर राहिलेल्या विषयावर बोलत जाते. माझ्या प्रार्थनेमुळे आणि भेटीमुळे तिला आजारावर मात करण्यास कसं बळ मिळालं ह्यावर भरभरून बोलत राहते...!

अरे हो हे एक सांगायचं राहिलंच ...

सहा-आठ महिन्यापूर्वी तिला एक जीवघेणा आजार झाल्याचं कळल्यावर, जाऊ की नको, ती आपल्याला ओळखेल की नाही, तिच्या कुटुंबाला काय वाटेल ह्या घालमेलीत दोन दिवस घालवल्यानंतर मनाचा हिय्या करून, मी तिला भेटायला गेलो होतो. तिच्या बेडशेजारी बसल्यावर तिच्या त्या पांढ-याफटक पडलेल्या चेह-याने तिने एकवार कृतज्ञतापूर्वक माझ्याकडे पाहिलं मग आपल्या नव-याकडे मान वळवून म्हणाली "मी म्हटलं नव्हतं, माझ्या वर्गमित्रांपैकी बाकी कुणी आलं, नाही आलं, तरी हा नक्की येईल म्हणून !"

मी मनाशी म्हणतो, रियुनियन अगदीच वाया गेलं असं म्हणता येणार नाही !

# कोरी गड नाईट ट्रेक

**--- एडवर्ड डिसोजा**

प्रबळ इच्छाशक्ति आणि निश्चयी मनाला वयाचं बंधन नसतं, याची प्रचिती तापाने फणफणत  असता केवळ निसर्गाची ओढ म्हणून ट्रेकिंगला आलेल्या जेम्सनकडे पाहून आली. साधारणतः वयाची चाळीशी ओलांडली की माणूस स्वतःला प्रौढ समजू लागतो आणि तरुणांबरोबर मिसळण्याचे कमी करतो, पण आपल्याहुन ८ – १० पावसाळे कमी पाहिलेल्या तरुणांच्या घोळक्यात सामाऊन त्यांच्या जोडीला त्याच जोशात ट्रेकिंग करणे हे तरुणपणाचे लक्षण नव्हे काय ?

"कुपारी ट्रेकर्स". वसईच्या उत्तर भागात 'कादोडी' भाषा बोलणाऱ्या कुपारी लोकांच्या समाजातील काही हौशी तरुणांनी हा ग्रुप बनवून कोरी गड नाईट ट्रेकचे आयोजन केले होते.

३१ मे २०१४ दुपारी दादर स्टेशनवरून पुणे एक्सप्रेस पकडून आम्हा ७-८ कुपारी तरुणांचा घोळका लोणावळाच्या दिशेने सुसाट निघाला. तीन साडेतीन तासांचा प्रवास संपवून संध्याकाळी ६-६.३० वा. लोणावळा स्टेशनवर उतरलो. आम्ही सारे पश्चिम पट्ट्यात राहणारे आणि पश्चिम रेल्वेने प्रवास करणारे म्हणून प्रत्येकवेळी अनोळखी स्टेशनवर उतरताच ईस्ट की वेस्ट विचारायची सवय जडलेली तीच लोणावळा स्टेशनवर उचंबळून आली. नेमके कुठल्या दिशेने जायचे हे कळत नव्हते. थोडी विचारपूस केल्यावर आम्हाला दिशा मिळाली. बस निघून गेल्याने खाजगी वाहनचालकाशी भाव करून आम्ही पेठशहापूरकडे मार्गस्थ झालो. गाडीत बसताक्षणीच उभ्याने केलेला रेल्वे प्रवासाचा क्षीण निघून मनाला एक वेगळीच तरारी / तरतरी  आली.

जुन्या ट्रेकिंगच्या गमती-जमती आणि आजूबाजूचा जंगलयुक्त डोंगराळ निसर्ग पाहण्यात २५-३० मिनिटांचा प्रवास वाऱ्याच्या झुळकीसारखा निघून गेला आणि आम्ही एकदाचे पेठशहापूर गावी पोचलो. सूर्य डोंगराआड लपल्याने पसरलेल्या संधीप्रकाशात आजूबाजूच्या परिसराला तांबूस झळाळी आली होती. हे केशरी सौंदर्य लुप्त होण्याधी डोळ्यांत आणि सोबतच्या मोबाइल, डिजिटल कॅमेऱ्यात कायमचे बंदिस्त करण्याची घाई आम्हाला झाली होती. दुपारचे हलके जेवण आणि ३-४ तासांच्या प्रवासाने पोटात कावकाव सुरू झालेली म्हणून गडाच्या पायथ्याशीच बस थांब्याजवळ असलेल्या छोट्या हॉटेलात गरमागरम ओम्लेट आणि अंडाभुर्जी पाव यावर यथेच्छ ताव मारला जोडीला चहाची तलफ भागवून आम्ही हॉटेल बाहेर पडलो. या हॉटेलात छोट्या छोट्या रूम्स बनवून राहण्याचीही सोय करण्यात आली आहे.

बाहेर अजून हलकासा उजेड होता आणि नाईट ट्रेक असल्याने हातात वेळ असल्याने आम्ही अंधारात विरघळून जाऊ लागलेल्या परिसराची टेहाळणी सुरू केली. प्रत्येकाचं आपलं फोटोसेशन सुरू होतं. फेरफटका मारताना गावातील काही तरुण मुले भेटली त्यांच्याशी गप्पा आणि गडाविषयी थोडीफार माहिती मिळविली. मुख्य उद्देश गडावर जाण्याचा रस्ता माहीत करून घेणे हा होता. बोलताना मुलं शिकलेली वाटली म्हणून सहजच त्यांच्या शिक्षणाबद्दल विचारपूस केली. हायस्कूल आणि कॉलेज हे लोणावळा स्टेशनला असून रोज अप-डाउन करतात. प्राथमिक शाळा गावातच असून आमच्या मागे असलेल्या शाळेकडे बोट दाखविले. शाळेची अवस्था बघून इथे

मुले शिक्षणासाठी येत असतील का असा प्रश्न साहजिकच मनात आला. कारण वस्तूची हालत एकदम दयनीय झाली होती पत्र्याचे तुटकेमुटके छप्पर, दरवाजेही तुटलेले. स्वछतागृहाविषयी कल्पना न केलेली बरी. त्याचवेळी दुसऱ्या बाजूला असलेल्या दगडी देवाला स्लॅबचे घर, सुरेख रंगरंगोटी, लाईटची योग्य व्यवस्था करण्यात आली होती. सातत्याने त्यावर अमाप खर्च केला जात असावा. पण ज्यामुळे उद्याची पिढी घडणार होती पुढे जाणार होती त्या शाळेच्या वस्तूकडे सातत्याने दुर्लक्ष केले जात होते तेही आजच्या संगणकीय युगात. दोन वास्तूंमधील हा विरोधाभास मन खिन्न करणारा होता.

रात्रीचे 8.30 वाजले होते आणि आमच्या आनंदाला उधाण आलेले. जेवणाचे सामान आणि इतर साहित्य घेऊन आम्ही गड चढाईला सुरवात केलेली. गाव ओलांडून आम्ही आता गडाच्या पायथ्याशी असलेल्या जंगलात आलो होतो. गर्द झाडी आणि मध्ये छोटी पाऊलवाट. समोर, मागे चहूबाजूला गडद अंधार.. मनात धाकधूक होती. त्यात रातकीड्यांची किर्रकिर्र, पक्षाच्या पंखाची फडफड, मधूनच एखाद्या पक्षाची उठलेली आरोळी मनाचा थरकाप उडवीत होती. अचानक चमचमणारा काजवा नजरेस पडला. मग अजून, मग अजून असे एकामागोमाग एक काजवे आमच्या अवतीभवती गिरक्या घेऊ लागले. या काजव्यांनी आम्हाला एका वेगळयाच दुनियेत आणून सोडले. थोड्या पुढेच काजव्यांनी व्यापलेले आख्खे झाड आमच्या नजरेस पडले.. जणू नभातील चांदण्या निखळून त्या झाडावर लगडल्या असाव्यात. ते मनोहारी अवर्णनीय असे  दृश्य डोळयांत कैद करण्यासाठी आम्ही हातातील टॉर्च बंद केल्या. पुढे वाटेला दोन फाटे फुटलेले आता आपली वाट नक्की कुठली हे शोधण्याचे काम त्या मिट्ट काळोखात सुरू झाले. मग असे आढळून आले की एका वाटेला उतार होता तर एकीला चढाव. एक २५-३० मिनिटांचा असा नयनरम्य प्रवास करीत आम्ही गडाच्या पायथ्याशी असलेल्या पायऱ्यांपर्यंत पोहोचलो. गड सर करण्यासाठी आमचं टोळकं सिद्ध झालं.

दळणवळणाच्या प्रत्येक जुन्या गोष्टींवर कोंक्रीटचे झालेले अतिक्रमण इथेही नजरेस पडले. गड जरी जुना असला तरी पायऱ्या ह्या सीमेंटने बाधलेल्या आजच्या काळातील होत्या. अर्धा गड चदून झाल्यावर आम्हाला गडाच्या ढासळलेल्या जुन्या पायऱ्या दिसल्या. पायऱ्यांचे एकेक दगड बघून तेव्हा हे दगड इथवर कसे आणले असतील, वर आणणारी त्याकाळची माणसे किती ताकदवान असतील याचे अप्रूप वाटले आणि आजच्या तंत्रज्ञानाचे अपयशही जाणवले कारण पायऱ्यांचे दगड उपलब्ध असूनही पायऱ्यांसाठी त्यांचा वापर केला गेला नव्हता, तर त्या सीमेंटने बांधून काढल्या होत्या. कदाचित यात गुंतलेले अर्थकारण हाही मुद्दा असू शकेल. थोड्याच वर एक गुहा सापडली ज्यात थंड आणि स्वच्छ पाण्यासाठी हौद होता. गडाची रखवाली करणाऱ्या सैनिकांना पाण्यासाठी पूर्ण गड चढावा लागू नये हीचं गुहेतील हौदामागची कल्पना असावी.

गडाच्या मध्यावर डोंगर खोदून पाण्यासाठी तयार केलेला आणखी एक हौद दिसला जो २०० स्क्वेयर फुट तरी नक्कीच असेल. हौदाच्या समोरच बसण्यासाठी कठडा बांधला होता. त्याच कठड्यावरून नयनरम्य आणि प्रेक्षणीय पर्यटनस्थळ म्हणून उच्च वर्गात मान्यता पावलेल्या Ambee Vally चे चमचमते शहर दिसून आले. खरोखर खूप सुंदर नजारा होता तो. काळोख असल्याने त्या सुंदर नजाऱ्याचे फोटो घेण्याचे आमचे प्रयत्न तोकडे पडले, परंतु एकाने त्याच्याजवळ असलेल्या DSLR कमेऱ्याद्वारे अतिशय सुंदर असा फोटो घेतलाच.

ट्रेकिंगच्या शेवटच्या पर्वाला सुरवात झालेली. अगदी १५-२० मिनिटांत आम्ही "गणेश दरवाजा" म्हणून ओळखल्या जाणाऱ्या गडाच्या प्रवेशद्वारपाशी पोचलो. ऐन गर्दीच्यावेळी ट्रेन मध्ये बसायला मिळाल्यावर जो आनंद होतो अगदी तसाच आनंद आमच्या मनातून चेहेऱ्यावर उमटत होता.

चांदण्या लगडलेलं स्वच्छ आभाळ, चौफेर मिट्ट काळोख आणि छिद्रे पडलेली पायाखालची खडकाळ जमीन. रात्र गडावरच काढायची असल्याने सपाट आणि सोयिस्कर अशा जागेचा शोध हातातील टॉर्चच्या उजेडात सुरू होता. गडावरील कोराई देवीच्या मंदिरात झोपण्याची सोय होईल ही माहिती गावातील पोरांकडून कळालेली म्हणून पहिल्यांदा मंदिर कुठे आहे याचा शोध सुरू झाला. अगदी कमी वेळात मंदिर सापडले. छोटेसे. बाजूला दोन अडीच फुट उंचीचा कठडा आणि समोर रंगविलेले मंदिर. मंदिराच क्षेत्रफळ आणि एकूण परिस्थिति लक्षात घेता हे मंदिर राहण्यालायक नाही याची खात्री पटली. भरीस भर म्हणून जे दिसू नये अशी जी मनाची समजूत घालीत होतो नेमके तेच टॉर्चच्या मर्यादित उजेडात मंदिराच्या प्रवेशद्वाराशी नजरेस पडलं. सापाचं पिल्लू. आता आख्खि रात्र गडावर कशी काढायची ही धाकधूक प्रत्येकाच्या मनात निर्माण झाली.

जिद्द न हारता काळोखात दुसऱ्या मंदिराचा शोध सुरू झाला. ते लवकरच सापडलेही. मंदिराला चोहोबाजुने ऊंच चौथरा, समोर त्याच उंचीचा ओटला त्यावर ५-६ फुट इंचीची दीपमाळ. जागेची योग्य ती पाहणी करून आम्ही पोटाची भूक शांत केली.

हळूहळू ढगांनी गडाला आपल्या मऊशार कवेत घेण्यास सुरवात केलेली. गार वाराही वाहू लागलेला. आजूबाजूच्या काटक्या जमवून भेसूर गळ्यांची शेकोटी प्रज्वलित झाली. प्रवासाचा शीण, पोटभर नाश्ता वर जेवण यामुळे सुस्ती आलेली. डोळे जड होऊ लागलेले. मंदिरात झोपायची सोय करून मोबाइल वरच्या संगीत मैफिलीत झोपी गेलो.

थंडीमुळे सगळ्यांनाच पहाटे खूप लवकर जाग आलेली. दार उघडून मंदिराबाहेर आलो तर गड गायब झाला होता. बघावं तिथे ढगांच पांघरून. आख्खा गड ढगांच्या अधीन झालेला. क्षणभर अंतराळात असल्याचा भास झाला. तीनचार फुटांवरचेच ते काय स्पष्ट दिसत होतं. शरीर आकसून जाईल असा हवेत गारठा होता. भर उन्हाळ्यात असे वातावरण आणि दृश्य मन मोहवून टाकत होतं.

जवळजवळ दोन अडीच फुट रुंद असलेल्या तटबंदिवरून आमची गडाची भ्रमंती सुरू झाली. पायथ्याशी असताना छोटा वाटणारा हा गड प्रत्यक्षात मोठा होता. गडाची तटबंदी साधारण २ – २ १/२ किमीच्या परिघात असेल. गडावर पाण्यासाठी २ तळी आणि दगडात खोदलेले हौदही आहे. सकाळच्या कोवळ्या उन्हात गड आणि पायथ्याचा हिरवागार निसर्ग न्हाऊन निघत होता. गडाला एकप्रकारचा सोनेरी मुलामा दिल्यासारखा भास होत होता.

ढासळलेले बुरूज, तटबंदी, काही ठिकाणी तडा गेलेल्या कडा. जरा जरी तोल गेला तर वाचण्याचीच शक्यताच नाही अशा या एकंदर परिस्थितीत गड पाहणे सुरू होते. वास्तव्यासाठी असलेल्या खोल्या, बैठकीच्या जागा, न्हाणीघर अशा तत्सम बाबींचे नामशेष होऊ घातलेले अवशेष (पाया असावा बहुदा) गडावर बऱ्याच ठिकाणी दिसून येतात.

असा एकंदरीत दोनअडीच तासांच्या भ्रमंतीनंतर आमचा गड उतरण्याचा प्रवास सुरू झाला. उतरताना जंगलातील पिकल्या करवंदाचा मनमुराद आस्वाद घेत अन सोनेरी गडाचे फोटो घेत घेत ३०-३५ मिनिटांत आम्ही पेठ शहापूर गावात आलो. कोरिगड किल्ला हा लोणावळ्यापासून २० किमी अंतरावर आहे. समुद्रसपाटीपासून ९२९ मी. उंचावर आहे.

# जेवण

--- एमेल आल्मेडा

आगमन काळातील पहिला रविवार.संध्याकाळची वेळ,मी गच्चीत उभा राहून अंगणात बाळयेशुच्या जन्मादेखाव्याचा नाताळ गोठा कुठे करावा ह्याचा विचार करत होतो?मनात संभ्रम होता.इतक्यात कामानिमित्त कुणीतरी भेटायला आले व तो विचार बाजूला सारला गेला.

सोमवारी दुपारी १ वाजता मी कामावरून घरी आलो.अंगणात गाडी लावत होतो.घरासमोर गटार बांधणीच्या कामावर आलेले काही मजूर जेवणासाठी माझ्या अंगणात जमले होते.१ घाटी कुटुंब ४ जणांचा संसार.वृद्ध आईवडील,मुलगा व सून असा चौकोनी परिवार.फाटक्या कपडयातील  आपली शिदोरी घेऊन ते  बसले होते.

सतरा अठरा वर्षाचा तलासरीचा एक आदिवासी मुलगा दुसऱ्या बाजूला एकटाच प्लास्टिकच्या पिशवीत असलेला डबा घेऊन बसला होता.

“अरे लेका,आमच्यात ये की,एकटा कशापायी बसतुया” म्हातारा बोलला.

“नको,नको मी जेवतो इकडे” तो तरुण ओशाळत बोलला.

“अरे,चल की” म्हणत तो घाटी तरुण त्याच्यापाशी गेला.त्याला आपल्या सोबत जेवायला घेऊन आला.

बाजूलाच झाडाखाली उत्तरभारतीय मिस्त्री विश्रांती घेत पडला होता.

“मिस्तरी,चलो खाना खानेको.” म्हणत ह्याने त्यालादेखील जबरदस्तीने जेवायला बोलावले.

आता सहाहीजण एकत्र बसले होते.आदिवासी मुलाने डबा उघडला.भात व त्यावर वांगं व बटाटा दिसत होतं.मिस्त्रीकडे तर डबाच नव्हता.

त्याच्या  म्हाताऱ्या आईने आपली शिदोरी उघडली.सगळ्यांना भाकर व भाजी वाढली.

“कांदा देऊ का?” तिने दोन्ही पाहुण्यांना विचारलं.

दोघांनीही कांद्याची फोड घेतली.जेवण सुरु झालं.

मी गॅलरीत उभा राहून गपचूप सारं बघत होतो.त्याचं जेवण सुरु होतं.

मजुरीवर आलेले चार मजूर आपलं जेवण सहा जणात वाटून जेवत होते.

मनात आलं,प्रभू येशूने  पाच हजारांना दोन मासे व पाच भाकरी जेऊ घातल्या त्यावेळी देखील असच आनंदाचं वातावरण असेल का?

मी घरात जाऊन जेवण आटोपलं.आज माझं पोट भरलं होतं आणि मनही तृप्त झालं होतं.

थोडया वेळाने मी परत बाहेर आलो.सर्वजण वामकुक्षी घेत होते.माझं मनदेखील भारावून गेलं होतं.एकप्रकारची अध्यात्मिक शांती मी अनुभवत होतो.मनातील कालचा संभ्रम दूर झाला  होता.

बाळयेशुचा जन्म त्या मजुरांच्या कुटुंबात झाल्याचे मला जाणवत होते.त्यांची हृदये ख्रिस्ताच्या स्वागतासाठी तयार होती.शांतीच्या राजाचे आगमण गरीब कुटुंबातील श्रीमंत हृदयात झाले होते.प्रेमाचा झरा त्यांच्या मनी अवतरला होता.त्याचा परिमल माझ्या अंगणी दरवळत होता.

नाताळ गोठयाची जागा परमेश्वरानेच मला दाखवली होती.तेही ख्रिसमसचा संदेश देऊन.

मला दत्ता हसलगीकर ह्यांच्या कवितेची एक ओळ आठवली,

आकाशाशी ज्यांचे नाते,

त्यांनी थोडे खाली यावे.

मातीत ज्यांचे जन्म मळले,

त्यांना उचलून वरती घ्यावे.

# पतझड

**---** रॉबर्ट फर्नांडिस**, मर्देस, वाघोली.**

"समझनी है जिंदगी को तो पिछे देखो
जिनी है जिंदगी को तो आगे देखे
बदलना है तो बस समय,एहसास,
आप के नजरिआ को..."

अचानक झाडाची पालवी गळावयास लागली ,पालवी रूपी झाड, टवटवित, हिरवेगार दिसणारे , प्रेमाची सावली व ऑक्सिजन पुरविणारे ,पक्षांना राहण्यासाठी आपल्या फांद्या देणारे , हे झाड जेव्हा भक्कास ,हिरमुसलेले, म्हातारे ,पालवी व पक्षीनी साथ सोडलेले असले की आपण समजतो की ऊतरती कळा म्हणजे "पतझड" मोसम चालू झाला ........

असाच एक काळ माझ्या जीवनात आला.मुलगा १०वी मध्ये, घरात खाणारी पाच मंडळी ,सर्वाची ज़िम्मेदारी खांद्यावर असताना व जीवनाच्या रस्त्यावरून सुरळीत गाडी चालत असताना मधेच आमचे चाक मोडले ...,चांगली नोकरी गेली ...!!

जो दुसऱ्यास आनंदी व त्यांच्या सुखासाठी झटणारा आज तो ऐकाकी, दुःखी ,निरऊत्सही,हिरमुसला होता, ऐका क्षणात जीवन अंधकारमय झाले.म्हणुन लोकांच्या लाजेने त्याने खोलीत बंद करून घेतले कारण त्यास विचारीत होते की आज तु कामावर गेला नाहीस का? व त्याचे ऊत्तर त्यांच्याकडे नव्हते. अशा प्रश्नांना सामोरे जाण्यापेक्षा त्याने लाजेने व भितीने स्वतःला खोलीत डांबुन घेणे पसंद केले .अंथरूणात पडून राहुन ,जेवण सोडल्यामुळे तब्येत खालावली. त्यामुळे आई व पत्नीस फार चिन्तां वाटू लागली. ते भयभीत झाले. त्यांस वाटत होते की हा अंधःर्या खोलीतून बाहेर आला तर त्याचा अर्धा प्रोब्लेम सुटेल. म्हणतात. ना "जेव्हा मायेची आणी प्रेमाची माणसे आपल्या जवळ असतात तेव्हा दुःख कितीही मोठे.असले तरी त्याच्या वेदना जाणवत नाही "

नोकरी मिळावी म्हणून आनेक मित्रांकडे पायधरणी केली. पण व्यर्थ. दिलासा मात्र मिळत होता. हळुहळु जवळचे मित्र दूरावत होते. गावातील एक व्याक्तीने अर्ज (बायोडाटा ) घेतला खरा पण त्यांनी तो ऑफीस मध्ये फाडून कचर्याच्या पेटीत टाकला हे तेथे काम करणार्या मित्राकडुन माहित पडले. तेव्हा मन खुप खिन्न झाले वाटले की अशा प्रकारची सुध्दा माणसं असतात या जगात. व या जगाचा नियम माझ्या लक्षात आला " उगवत्याला सलाम नी मावळत्याला पाठ "असे अनेक अनुभव मला पुढे-पुढे येत गेले.. आपल्या समाज्यातील एक वि.पी पदावर कार्यरत आहे त्यानी फक्त आश्वाशने दिली. एकाने तर कहरच केला त्यांच्या कंम्पनीमध्ये मुलाखत देऊन आज दोन वर्ष झाली. सगळे लेटर तयार आहेत. म्हणतो की फक्त ओनरची सही बाकी आहे ...अजुनही त्या लेटरची वाट पाहत आहे......!!

सगळयांकडुन अपयश पदरी आल्यामुळे मानसिक खचलो ,पुढे त्यामुळे मुलाखत देता येईना...मुलाखतीच्या वेळेस त..त..फ..फ.. हाऊ लागले, कधीकधी विचारानी एकदम स्तब्ध होऊन जायचो.

समोरच्यास असे वाटत असे की याला काही माहित नाही तर आम्ही याला नोकरी कशी द्यायची ?
अशावेळी मनात विचार आला "नकारत्मक विचारानी काही प्रश्न सुटणार नाही.परंन्तु नुकसान मात्र होईल.पण.सकारात्मक विचारणी माझे नुकसान नाही परंन्तु प्रश्न सोडविण्यास दिशा तरी मिळेल "
अशा ह्या स्थितीत या जीवनास कंटाळलो, हे जीवन संपवावे .आपण घरच्यावर ओझे आहोत असे वाटले. या सर्वातुन मार्ग निघाव म्हणून जास्तीत-जास्त देवाच्या सानिध्यात राहण्याचा घरच्यानी सल्ला दिला.प्रार्थनेत असताना माझा एक वर्गमित्राची भेट झाली. मुलाचा खर्च कोठून आणणार यावर चर्चा करीत असता त्याने लाईफ ईन्शुरन्स एजंन्टसाठी परीक्षा देण्यास सागितले. मनाला न पटणारे काम नसताना सुध्दा घर खर्चासाठी तयार झालो. हे काम म्हणजे कोणापूढे हात पसरवीने आवडत नव्हते. मनाला पटणारे नव्हते .एवढी मित्रमडंळी ,पाहुणे असून सूध्हा या कामात देखील अपयशी ठरलो.लोक प्रेमाने व आपुलकीने बोलायचे परंन्तु पॉलिसीचे नाव काढले की विषय बदलून टाकायचे.
मी त्यांच्याकढून काही मागतो म्हणून ते दूर सारायचे. पार्टीसाठी भरपूर फोन करणारे आता ते फोन उचलत नव्हते. मन एकदम खिन्न झाले. माझी ही स्थिती पाहून एक जवळचा मित्र म्हणाला की माझ्या ऑफिसला तु ये घरखर्च सुटेल.ह्या शब्दानी मन भरुन आले.
"या जगात वाट दाखवणारे अनेक जण. असतात पण चालणारे आपण एकटेच असतो.पडल्यावर हसणारे अनेक पण मदतीचा हात देणारे ते फक्त जिवलग असतात"
पण मी एक टेक्निकल माणूस ,ऑफिसमधले काम काही जमत नव्हते. मन बैचैन झाले होते.ठरविले की देवाला विचारुन पाहू. आयुष्यात कुठे कमी पडलो /कुठे चुकलो. कारण मला माहीत होते की प्रेमळ पिता परमेश्वर,ज्याने मला या धरतीवर जन्माला पाठविले आहे. त्याला माझी काळजी असणार, तन -मनानी आपली संकटे त्याच्या हवाली केली. पत्नी सोबत नानभाटला प्रार्थनेसाठी जाऊ लागलो. थोड्याच अवधीत जिथे १५ वर्षे अगोदर कामाला होतो,ज्यांना माझ्या कामाविषयी माहिती होती त्यानी माझी मुलाखत न घेता कामावर रुजु होण्यास सागितले हे ऐकुन मी परमश्वराचे आभार मानले .त्याच वेळेस मुखातुन शब्ध बाहेर पडले"देवा" तुला काहीही अशक्य नाही...चागल्या गोष्टी त्याना मिळतात जे वाट बघतात,अधिक चागल्या गोष्टी त्याना मिळतात जे प्रयत्न करतात, पण सर्वोत्तम गोष्टी त्यानाच मिळतात जे आपल्या प्रयत्नावर अतुट विश्वास ठेवतात ,......आयुष्य अवघड आहे पण अशक्य काहिही नाही"
पण त्याची एक अट होती की सध्याच्या पदापेक्षा खालच्या पदावर काम करावे लागेल. मी मागचा-पुढचा विचार न करीता होकार दिला. कदाचित ही देवाची योजना असेल.... व आता परमेश्वर क्रुपेनी माझे जीवन सुरळीत आहे.
हा लेख लिहीण्याचा मुळ उद्देश की या जगात माझ्यापेक्षा कित्येकांची दुःखे /संकटे फार मोठी आहेत. आई+मूलांचा विरह, पति +पत्नीचा विरह, कोणी मोठ्या आजारानी त्रस्त, कोणाची नोकरी नाही तर कोणाचा धंद्यात नुकसान... अशांना धीर मिळावा व मनात वाईट विचार न आणता ,आपली सर्व अडचणी व संकटे परमेश्वराच्या हवाली करावे .कारण जो तारणारा प्रभु येशु जन्माला येणार त्याला आपली दुःखे/संकटे माहित आहेत.त्याकरीता..
"बिदास मुस्काराओ क्या गम है.।
ये जिंदगी मे टेन्शन किसको कम है..।
अच्छा या बुरा तो केवल एक भ्रम है...।
जिन्दगी का नाम ही कभी खुशी कभी गम है....।"

**कविता / चारोळया :-**

# 1970 मध्ये जन्म झाल्यानंतर

**---** वर्जेश ईश्वरलाल सोलंकी

1
1970 मध्ये जन्म झाल्यानंतर
पंच्याहत्तर मध्ये समजलं की आपला एका शिंपी समाजात जन्म झालेला आहे म्हणून
आपण कुठुन ह्या गावात आलो हे आजीला पण थेट सांगता यायच नाही
ती सांगायची आपल्या कडे टांगा होता
थोडा जमीन जुमलाही होता
म्हणायची ***सारु होतु ब्रिटीश राज***
***अवे तो आ घोडाने खावाना आपवावाला गहु खावा पडे छे***
मात्र तुझ्या आज्याला स्वतःलाही व स्थावर जंगमलाही टिकवता आलं नाही.
***उ वेचवा नय आप्यु आपडु घर***
असं आज्याला खंकेरताना
सोडुन गेला मागे ठेवुन हे वेदनेच अस्तर, कुटुंबकबिला
तिची मुळ इथल्या मातीतच रुजुन पसरलेली
व पुन्हा वरती येवुन अवकाशाचा तोल सांभाळत राहिलेली
आपला एक काका वेडाच्या झटक्याने वारला
आपली एक आत्या अल्पशा आजाराने दगावलेली
मध्येच शाळा सोडुन द्यावी लागलेली बापाला
व पायाखाली आलेलं होतं परंपरागत चालत आलेलं शिलाई मशीन
अंगावर एकच लुगडं नेसुन लग्न करुन आलेली आई
फुंकत राहिलेली कितीतरी वर्ष चुलीमधला जाळ
रिपेअर करत राहिलेली स्टोव्हचा बर्नर
वाहत राहिलेली आमचं ओझं
हे हळुहळु सांगत राहिले तिचे डोळे
अंधाराचि एक आदिम रांगोळी ती कोरत राहिलेली घराच्या भिंताडावर
ती नव्हती सिंड्रेला व
राजकुमाराला भेटण्याच्या नादात हरवला नव्हता तिचा बुट
मोनालिसासारखं नव्हतं तिचं स्मित
उगवुन आलं नव्हतं तिच्या डोळयात नार्सिअसचं फुल
यक्षाने तिला घातली नव्हती मागणी

गरीब सुदाम्याचीही नव्हती ती बायको
ती आमची आई होती
व तिला कुठलीच प्रणाली कॉपी पेस्ट करु शकणार नव्हती
तिच्या आई असण्याच्या पेटंट वर कोणिच डल्ला मारु शकणार नव्हतं
अगदी आजच्या संगणकीय पर्यावरणातही

2

1970 मध्ये जन्म झाल्यानंतर
ऐंशीच्या दशकात कुठेतरी समजायला लागलं की आपण भारताचे नागरीक आहोत म्हणुन
व आपल्या देशात लोकशाही प्रणाली आहे
आपले गाव हे ग्रामपंचायतीच्या अखत्यारीत येते
व सगळी सुत्र ही सरपंचाकडे असतात.
राज्याचा एक मंत्री असतो
व देशाला एक पंतप्रधान असतो
एक राषट्रपती असतो
लोकसभा, विधानसभा, संसद  हे काहीच माहित नव्हतं
किती मत मिळाल्यावर कोण जिंकत हेही काहीच माहित नव्हतं
घरात राजकीय चिन्ह असलेली पत्रक यायची
पाच वर्षानंतर
व गावात टांगा फिरु लागल्यावर एक जिलेबी तेल मे जनता पार्टी जेल मे
असं ऐकु आल्यावर समजायचं की निवडणुका आता सुरु होणार म्हणुन
गावाला नवीन सरपंच किंवा तोच सरपंच घुमुन फिरुन मिळणार म्हणुन
घराघराच्या भिंती गेरुने रंगलेल्या दिसुन यायच्या
आगास्कर पेन्टरला जॅम काम मिळायचं
त्याची विजार व शर्ट रंगाने माखलेली असायची
व मिशीला इस्टमन कलरची झालर दिसायची
अशा काळात कामतच्या हॉटेलात जिलेबी फ्रि असायची
बापाला विचारलं आपलं पत्रिकेत नाव का नाही म्हणुन
तर ते मनले मतदानाला अमुकएक वयाची अट असते
आपल वय कधी होणार
हा मोठाच प्रश्न आपल्या पुढ्यात उभा ठाकलेला असायचा.
तुझे दात चिमणीचे आहेत म्हणुन कुणीतरी खिजवायचं
निवडणुका असल्या की बरं असायचँ

टीव्हीवर नवा सिनेमा दाखवला जायचा
शांतारामने चारवेळा बोगस मतदान केल्याची बातमी काही दिवस चर्चेचा विषय असायची
व धर्मेन्द्रच्या घरात कोंबडीच्या जेवणावर ताव मारलेल्याचा  वास बहुतेकांच्या  बोटांना असायचा
निवडणुक व मतदान किती सुंदर गोष्ट आहे
असं विसाव्या शतकातही वाटत राहिलेलं.

3
1970 मध्ये जन्म झाल्यानंतर
इतिहासाच्या पुस्तकाने माहिती दिली कि
महात्मा गांधींना चालत्या गाड़ीतुन सामानासकट बाहेर ढकलुन दिलं म्हणुन
व शेवटात सांगितलं कि एका माथेफिरुने त्यांचा खुन  केला म्हणुन
बाई शिकवत राहिल्या इतिहास भुगोल
मन कुठेतरी शेतात भिरभिरुन आलं
का केला गेला असावा खुन गांधीबाबाचा
शाळेच्या कुंपणावरले कावळे
मेंदुत येवुन काव काव करु लागलेले
का केली गेली हत्या
एका नंग्या फकीराची?
चंद्रकांत मनला गांधीजी असल्याअसते तर आपल्या सगळय़ांची आजच्या घडीला सुंता झाली असती
त्याचे बाबा म्हणतात त्यांनी आपल्या शत्रुराष्ट्राला तेहतीस कोटी दिले त्याचीच ही भरपाई
आजीला घरी येवुन विचारलं तर ती म्हणाली
बो सारो मानस हतो गांधीजी अमारा बोर्डी गाम मा आवी गयला
आईला विचारुन मतलबच नव्हत
तिला स्टोव्हसाठी रॉकेल हव होतं
डब्यात चहासाठी भुकटी नव्हति
बापाकडे गांधी हत्येच थेट उत्तरच नव्हतं
नेहरु करता देश ना प्रधानमंत्री पटेल बनवा जोता होता
तो आजनु पिक्चर कय अलग बनते.
असं डबल माईंडेड उत्तर देवुन मुळ प्रश्नाला
बगल दिलेली.
खुप जणांना खुप प्रश्न विचारले
उलटसुलट उत्तरे येत राहिलेली.
काळाची कितितरी तपे दशके उलटुन गेलेली
प्रश्नांची तितकीच जटील भेंडोळी वर्तमानकाळातुन
भुतकाळात पसार झालेली
हत्या किती महत्वाची होती

असाच ब-याच जणांच्या बोलण्याचा कल दिसुन आलेला.
हत्या नवीन नव्हती जगाला
व समजु उमजु आल्यापासुन पाहत आलेलो आपण
तिचं अक्राळविक्राळ रुप
जनमेजयच्या सर्पसत्रापासुन ते ग्रोधाकांड इत्यादी

1970 मध्ये जन्म झाल्यानंतर ते विसावं शतक दरवाज्यात येवुन ठेपलं तरी
हत्यासत्र चालुच होतं.

मारणा-यांचि नावे व गणवेश फक्त बदलत राहिले

4
1970 मध्ये जन्म झाल्यानंतर
भारताला स्वतंत्र होवून पंचवीस वर्षे लोटली होती.
सिंधु नदी पाकीस्तानात गेली होती
व पाकीस्तान हिन्दुस्तान मधुन निघुन गेलं होतं
भारताच्या नकाशात काश्मीर होतं ते किती
आपल्यात होतं हे भुगोलाच्या पुस्तकालाही ठावुक नव्हतं
ताश्कंद करारावर सह्या करता करता
लालबहादुर शास्त्रींचा धडा पुस्तकात आला होता
जय जवान जय किसान चा नारा
इतिहासजमा होत जाताना दिसत होता
हरितक्रांती हा सुंदर शब्द होता
वॉलंटियरनी छातीला बॅच मिरवावा तसा.
नेहरु मुलांचे होते
फुलांचे होते
प्रकाश म्हणाला त्यांनी कधी मुलांची हगुरडी गांड धुतली का
कधी पण पाहावे आपला मुलांचा चुंबन घेतलेला फोटो
प्रकाश असच बोलायचा आकसुन
आक्रोशुन
त्याच्या नाकावरची नस फुरफुरत राहायची
नेहरु शब्दाचा त्याला राग होता
सावरकरांना तो आपला आदर्श मानायचा
एकदा सुतळि बॉम्बचं प्रात्यक्षिक दाखवलं होतं त्यानं शेतात.
टरकुनच गेलो होतो आपण
का बोल्ला इतक्या मोठ्या माणसाबद्दल तो असा

सामान्य लोकांना पडावा तसा आपल्याला पडलेला बापडा सामान्य प्रश्न
भारताच्या पहिल्या-वहिल्या पंतप्रधानाबद्दल.

5
1970 मध्ये जन्म झाल्यानंतर
1973 सालात मुलांना जंजीर हिन्दी सिनेमा खुपच आवडला होता
सिनेमात क्रांती व जान आली होती.
व एक नवा मसिहा जन्माला आला होता
जंगलराज व माफिया लोकांच्या उदयाचा तो सुवर्णकाळ होता असं कुणीतरी म्हणालं
समुद्रमार्गे माल गोदीत यायचा

***गरीब का बच्चा अब गरीब नही रहेगा*** असल्या फिल्मी संवादावर
पिटात टाळ्या पडताना दिसल्या.
1970 मध्ये जन्म झालेल्या आमच्या सारख्यांना
माहितच नव्हता आणीबाणी देशात लादला गेल्याचा काळ
इंदिरा गांधी, नजरकैद, अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर गदा, भुमिगत, राजकीय माफियांचा हैदोस, तुरुंगवास
असं काय-काय
समजत राहिलं नव्वदच्या दशकात
बाईचं राज्य जाणार अशा चर्चा
खर्रकन भिंतीवरुन पोस्टर टरकावं तसं निघुन गेलं तिचं औट घटकेचं राज्य
हाताच्या चिन्हाऐवजी सर्वत्र दिसु लागलेली भिंतीभिंतीवर  चक्राची चिन्हे
गली गली मे नारा है, जनता दल को अब पुकारा है
अशा आरोळया व बदललेलं समाजमन
कुठल्याकुठल्या घटकपळावर उमटत राहिलं.

# प्रगती

--- महेश लीलापंडित

शिकने म्हन्जे प्रगती
जनावरे पन शिकतात
मन्दीरा भायेर
गुमान उन्हात हुब्ब
मालकाने विकलेला
भावीक चारा
घश्यासाठी
खंडया हालवतो शेप्टी
मोजतो घास
वैताग तुक्डा
घश्यासाठी
मी बी शिक्लो
पैसा
ब्ल^कहोल पोटासाठी

मी बी शिक्लो
आंडे घाल्ता येत नस्ताना
खायची कशी
किम्तीला येखादयाच्या निरवंश
दुध देता येत नस्ताना
पीयाच कसं
किम्तीला पील्लू भुकं

प्रगती झाली भो
भो प्रगती झाली

मला कर्ता यत न्हाई
कातडयाची गोदडी नी
चादर खंडया वानी

मग
मी बी शिक्लो
पैसा

घेउ शकतो मी शीक्के
पायजेल तेव्हा
पायजेल ते

पैसा रूपांतरीत
दारू पैसा व्यासपीठ करीयर
ताकद लोकमत छप्पर गोदडी नी
चादर भाकर इतर मध्ये

सारं काही
फ्लूइड एक्सचेन्ज बी
रूपांतरीत
पैसा मध्ये

प्रगती झाली भो
भो प्रगती झाली

# हिंदोळा

**---** फेलिक्स डिसोजा

1
सांस्कृतिक वस्तुसंग्रहालयाच्या मध्यभागी
हिंदोळा आक्रसून
घट्ट वीण दोरखंडाची
ज्याचं झुलणं काबूत
डोन्ट टचच्या बोर्डावर

मात्र एखाद्या खोडकर मुलाला
थांबवू शकत नाही हिंदोळा स्पर्शापासून
तो आपल्या दोन्ही हातांनी झुलवू लागतो हिंदोळा
न गंजलेल्या कड्यातून ऐकू येऊ लागतो
कुणा म्हाताऱ्याच्या खाकरण्याचा आवाज
जो हळू हळू परावार्तित होत जातो संगीतात
ज्यात मिसळलेल्या असतात
हास्याच्या-पैजणीच्या- झुमक्यांच्या
गप्पाच्या आणि अश्रूंच्याही
अनेक लयी .

आणि झुलणारा हिंदोळा झुलत राहतो
कष्टाने घामेजलेला थकव्याची
वाट पाहत
विसाव्याचे संगीत वाजवत
झुलत राहतो .

2.

भोवताली
माणसाचं गोत मिरवण्याचे ते दिवस होते
हिंदोळ्यावर नातवंडाचा गलका ऐकत
आजी अभिमानाने गुंफायची माणसं

आपल्या ओवीत

लानुला उखाळ भरेल्या मोत्याने I
घर भरले नातोंड्याने भोट्या आय तुझा II
नातोंड्या पोतोंड्याने वेडियलॉ गाव I
सरव्या दारा नाव भोट्या आय तुझा II

वाढत्या वयात अंधुक व्हावा डोळ्यातला प्रकाश
तसा आटत गेला आजीभोवतीचा गोतावळा

अंगाखांद्यावर धावणारी पावलं
अंगणात खेळता खेळता इतकी दूर निघून गेली
की पडावं लागलं तिला सांस्कृतिक कोपऱ्याच्या बाहेर
सरणाऱ्या दिवसात बोटं मोजत
कशाची तरी वाट पाहत

सगळ्यापासून एकाकी पडण्याच्या या काळात
एकटीनेच काढावे लागले तिला आपले शेवटचे दिवस

3.

शेण माती आणि पाण्याशी दोन हात करता
करता आई पुटपुटयाची काही बाही
आसुसलेले कान धावायचे आईच्या शब्दाकडे
आणि ऐकू यायच्या ती म्हणत असलेल्या प्रार्थना

'देरे देवा माला आंगभर काम I
गोठयाभर शेण देईवे माज्या II

दिवसाचा कुठलातरी तुकडा कष्टातून बाहेर ओढून
घेऊन यायचा तिला हिंदोळ्यावर
ज्यावर बसून ती पाहायची अंगणात खेळणाऱ्या
आपल्या मुलीला
अनेकदा हिंदोळा घेऊन गेलाय तिला माहेरच्या आठवणीत
आणि
यावरूनच नेलं आहे तिने बाळाला

मामाकडे जाणाऱ्या झुकझुकगाडीत
हिंदोळ्यावरूनच दाखवला आहे तिने
बाळाला चांदोमामा

खूपदा माहेरच्या माणसाशीच बोलल्यागत गुणगुणायची ती
आणि ठेऊन द्यायची आपले दुःख हिंदोळ्याच्या पार्श्वसंगीतात

आईसाठी हिंदोळा म्हणजे केवळ
विश्रांतीची एक जागा नव्हती
तो होता तिच्यासाठी हक्काचा माणूस
जेथे तिच्या आठवणीला उधाण यायचं आणि
करकरणाऱ्या संगीतात लपविता येत होता
तिला अश्रूंचा आवज

माणसांच्या शृंखला तुटणाच्या या काळात
राहिली नाही घरात हिंदोळ्यासाठी जागा
आणि आईसाठीही

दारात वाट पाहत लावत असते
आपल्या दुःखऱ्या मांडीवर मलम
सापडत नाही तिला घरात विसाव्याचं एकही ठिकाण
आणि ठणकत राहतो आयुष्यभराचा थकवा
हात पाय आणि ह्दयातून
ओसंडून वाहणारा

५.

घर आणि आकाश यांच्या मध्ये
उसळी घेत राहायचा मुलांचा उत्साह हिंदोळ्यावर

आणि
हिंदोळ्यावर मुली पाहायच्या आपल्या
सासरची स्वप्नं
हिंदोळ्यावरच येणार असतो
लग्नाच्या आदल्या दिवशी नवऱ्याकडून आयस
हिंदोळ्यावरच घेणार होत्या त्या आपल्या

सासरकडून येणाऱ्या नव्याकोऱ्या शालूचा वास
कानातल्या झुमक्यांची किणकिण

लाजत स्वप्नं पाहण्याच्या त्या दिवसात
मुली सजवायच्या एकमेकींच्या सासरचा  राजवाडा
मैतरणी सोबत

६.
आजोबा मेले तेव्हा सात दिवस
काढून ठेवला होता हिंदोळा
कौटोंबिक दुखवटा म्हणून
निखळलेल्या हिंदोळ्याकडे पाहिलं कि दिसायचं
घरातल्या माणसाविषयीचं प्रेम

जे उडून गेलाय आपल्या अंगणातून
शेणामातीचा वास
तसं नाहीस झालंय आपल्या आत्म्यातून

 हिंदोळा सोडून आलो आपण सांस्कृतिक
वस्तुसंग्रहायलयात
सोडून आलो आपल्या भाषेतून उमटणारी दुःखाची ओवी
सोडून आलो आपल्या भाषेतून प्रेम करण्याच आपलं कसब

आणि घेऊन आलो ही काळाची कोठडी
शिकू लागलो परक्या भाषेत स्वप्नं पाहण्याची कला

ज्यात आकाशाची खिडकी
अधिकाधिक होत गेली लहान
आपल्या मनासारखी

आणि काळाला पकडण्याची
करीत असताना धडपड
आपण होत गेलो बंदिस्त.

( लोकवाङमयगृह प्रकाशनतर्फे फेलिक्स डिसोजा याचा कवितासंग्रह लवकरच प्रकाशित होत आहे.)

# ही अनामयात्रा नाममात्र

**---- सबिना फोस (गास- वसई)**

आधी तयारी मज पथिका
करूदे रे मरणाला भेटण्याची
मग निघू आपण जीवनप्रवासाला
जीवनपथावरीच कोठे
उभे ठाकतसे ते मरण
पहा, इतक्या दुरूनीच मज ते दिसे
परी नच जमे पाहुनी अंदाज करण्या
असे किती दूर ते,
किंवा असे जवळ
की कुठे येथेच हाकेच्या अंतरावर
अवचित ते भेटेल मार्गात जेव्हा
न आपणास भेटेल सवड.
म्हणुनी करूदे रे
तयारी मज पथिका
मरणाला भेटण्याची
मग निघू आपण जीवन प्रवासाला
तूही पथिक अन्
मीही पथिकच.
आपली असे ही
अनामयात्रा नाममात्र.
चालता चालविता तोच एक.

# ख्रिस्त...

**--- बर्नड लोपीस, आगाशी**

वो ढुँढ रहे थे बब्बर शेर मगर
ये आ गया मेमना बनकर
और फिर हो गयी गलतफहमी

वो चाह रहे थे आदमखोर
पर ले आया शांती की डोर
और फिर हो गयी गलतफहमी

ऊम्मीद थी सुने राजा की ललकार
और वो पहुच गया नौकर बनकर
और फिर हो गयी गलतफहमी

करते रहे थे मजहब की रखवाली
ऊसने भेट मे दे दी खुद की सुली
और फिर हो गयी गलतफहमी

वो चाहते थे अपने जैसा हो
ऊसका मकसद भी पैसा हो
ऊसने ऊसूल अपना बना डाला
ऊन्हे अपने ही रंग मे रंग ड़ाला
और फिर हो गयी गलतफहमी

# माझे अवसान

## --- आयवन क्रास्टो, उमराळे

जमा झालेले माझे अवसान,
धैर्याच्या ओवणीतून निसटले.
अन नाभीतून उभा संचारला,
भीतीचा आकारहीन गोळा.
समोर उभा दैत्यरूपी,
काळीज चर्र करणारा,
छातीत काळीज नसणारा,
धर्माने रंगलेला पिसाळ जमाव.
मी रंगहीन होतो तोपर्यंत,
मी आकारहीन होतो तोपर्यंत,
समोर जमत होता काळ ,
धर्मग्रंथातून बाहेर पडून,
सोयीस्कर भरकटलेला,
जीव घ्यावयास आतुरलेला विखार!

मला आठवले त्यावेळी,
बायबलमधले क्षमेचे उतारे,
कुराणातले निर्मळ आयाते,
उपनिषदात उमटणारा मोक्ष,
ही शेवटची आठवण
इथून पुढे शेवटाचा प्रवास,
धर्म नसलेल्या जीवाचा,
धर्मांध हातातून अपहार.

# ती

**---** डॉ.  रिबेका विनीत दोडती.

सुखांनी मोहरून जाण्याचे ते नऊ मास...
जाईच्या पाकळी सारखे...
नाजूक पण तितकेच अल्लड ...प्रत्येक स्त्री ला  सुखावणारे..
ती बातमी कळताच वाढतं किंचित वजन त्या 'स्त्री' चं सार्यांच्या नजरेत...
पण 'ती'  मात्र उतरली  होती  सर्वांच्या नजरेतून ...
कारण बाळाचा बाप ठाऊक नव्हता समाजाला ...आणि तिलाही..
वय कोवळं होतं पण 'ती' चुकली नव्हती...
गुंतली होती एका उदात्त निर्मितीत...
विधात्याच्या उत्पत्तीत...
'तुझ्या शब्दाप्रमाणे होवो' म्हणत 'दासी' झालेली...
कौतुका ऐवजी निर्भर्स्तना झाली तरी 'ती'  निराश झाली नाही...
जपणुकीऐवजी  पदरी जबाबदारी आली तरी 'ती ' कर्तव्याला चुकली नाही....
सुविधेऐवजी अडगळ झाली तरी तिने दुषणं दिली नाहीत...
प्रेमाने स्वीकारण्याऐवजी अव्हेरली तरी 'ती' डगमगली नाही...
'सत्या'चं 'जीवन' मिळावं म्हणून येणाऱ्या 'मार्गा'ची ती जीवनधारा  बनली....
गुरांच्या वात्सल्यात तेजस्वी बाळ प्रसवली...
तारणाची माता बनली...
मरिया...
एकदा तिच्याकडे पहावं ...एकदा स्वतः कडे...
एकदा तिच्याकडे पहावं... आणि एकदा वेदनेत असणाऱ्या प्रत्येक स्त्री कडे....

# नव्या युगाची झाली पहाट

-- फ्रँक डॉ. मिरांडा, उमराळे

कित्येक आठवडे ती तापाने बेजार झाली,
औषधाच्या बाटल्या नि गोळयाची पाकिटं केली खाली.
घरगुती उपचार आले नाही कामी,
ती त्यानंतर रुग्नालयात भरती झाली.
एकाच ताटात तिने मुलांना जेवायला दिले,
त्याच ताटाचे मुलांनी दोन भाग केले.
डॉक्टरांचा खर्च दोघांनी विभागुण दिला,
मुलांचा स्वार्थ पाहून तापही पळून गेला.
तिच्या जीवनात नव्या युगाची झाली पहाट

दिसण्यात सुंदर, पण पायांनी ती अधु,
परगावातून आलेली ती एक सुंदर नववधू.
सासु-सासऱ्याशी ती प्रेमाने वागली,
घरात ती सुखात नांदू लागली.
वर्षा-मागुन-वर्षे सरत गेली,
पण, तिला अपत्याची देणगी नाही दिली.
त्या दिवशी चमत्काराने तिला गर्भधारणा झाली,
तिच्या घरात आनंदाची बातमी आली.
तिच्या जीवनात नव्या युगाची झाली पहाट

गरीब संसार सजवत होती त्यांची आई,
मुलांना खुप शिक्षण देण्याचे स्वप्न पाही.
मध्यंतरी नवऱ्याला देवआज्ञा आली,
तिच्या जीवनाची राख-रांगोळी झाली.
काबाडकष्ट करून तिने मुलांना मोठे केले,
मुलं मात्र तिचे श्रम झटक्यात विसरून गेले.
पैशापोटी ते स्वत:च्या आईला विसरले,
माणुसकीच्या टोकावरुन ते स्वार्थावर घसरले.
एक-एक महिना अशी विभागणी झाली,

त्याच दरम्यान ती देवराज्यात सुखाने गेली.
तिच्या जीवनात नव्या युगाची झाली पहाट

ती एक उमलती नाजुक कळी,
डोळयादेखत जात होता तिच्या प्रेमाचा बळी.
वय वाढल्यानंतरही तिच्या पसंतीला विरोध,
सुरु झाला तिच्यासाठी मुलाचा शोध.
घरच्यांना जिंकण्यासाठी प्रयत्न केले,
पण सर्वकाही व्यर्थ गेले.
त्यांचा निर्णय कायम राहिला,
प्रेमाचा अंत तिने जवळुन पाहिला.
मधून ती फारच दचकली,
पण प्रेमासाठी पुढे फरफटली.
त्या दिवशी घरून अनपेक्षित होकार आला,
तिच्या सत्य प्रेमाचा विजय झाला.
तिच्या जीवनात नव्या युगाची झाली पहाट

जन्मताच ती पायाने अपंग,
तिच्या स्वपनांचा झाला भंग.
देवाच्या देणगीवर ती नाराज नव्हती,
ती तिच्या जीवनात खुप खुश होती.
कोणाला चालताना पाहून तिही प्रयत्न करायची,
पण, जास्तवेळ आधाराशिवाय तग नाही धरायची.
ती धम्म्म करून खाली कोसळायची,
देवाला दोष देत मुसु-मुसु रडायची.
त्या दिवशी तिच्या पायाला फार वेदना झाल्या,
अंगातून घामाच्या धारा वाहूनी आल्या.
प्रयत्न करून ती उभी राहिली,
तिच्या पायावर तिने खून पहिली.
देवशक्तिने ती पुढे-पुढे चालू लागली,
आनंदाने ती अश्रु गाळू लागली.
तिच्या जीवनात नव्या युगाची झाली

# स्त्री

--- मॅल्सिना मायकल तूस्कानो

ती एक स्त्री आहे
अन्यायाने पिडलेली,
समाजाने लाथाडलेली,
आणि एकाकी राहणारी,
कारण ती एक दुर्बल स्त्री आहे,

समाजातल्या चर्चेचा विषय बनलेली,
वाईटांच्या नजरेत भरलेली,
आणि हास्यांचा विषय झालेली,
कारण ती एक दुर्बल स्त्री आहे,

जी वावरली 16व्या शतकात,
घरदार सांभाळत राहिली नवऱ्याच्या धाकात,
शिक्षणा पासून वंचीत राहिली ती घरात,
कारण ती एक दुर्बल स्त्री आहे,

जिने फक्त चूल आणि मुलंच सांभाळले,
समाजाच्या प्रत्येक प्रथेला जोपासले,
तरी नवर्याने दारू पिऊन तिलाच लाथाडले,
कारण ती एक दुर्बल स्त्री आहे,

जिने स्वतः आधी विचार केला दुसर्याचा,
कायमच आदर केला तिने नवर्याचा,
पण तिला कधीच नाही मिळाला शब्द प्रेमाचा,
कारण ती एक दुर्बल स्त्री आहे,

जिने कायमच सहन केला दारुडया पतीच्या शिव्या अन मारहाण,
प्रथेला बळी जावं लागलं तिला विनाकारण,
समाजापुढे तिला पाळाव्या लागल्या रितीरीवाज अन शासन,
कारण ती एक दुर्बल स्त्री होती,

पण काळ बदलला,
आणि स्त्रियांही बदलल्या,

आता ती एक स्त्री आहे,
अन्यायाला वाचा फोडणारी,
समाजाला चांगला उपदेश करणारी,
आणि पुरुषांच्या खांद्याला खांदा देणारी,
कारण ती एक सशक्त स्त्री आहे,

समाजापुढे लढणारी,
वाईटांना सुधरवणारी,
आणि तिला हसणाऱ्यानां पश्चाताप करवणारी,
कारण ती एक सशक्त स्त्री आहे,

जी राहते आता 21व्या शतकात,
घरदार सांभाळून काम करते ऑफिसात,
पुरुषांपेक्षाही पुढे गेली आहे ती शिक्षणात,
कारण ती सशक्त स्त्री आहे,

जी घरदार बरोबर शाळा कॉलेजही सांभाळते,
देशाच्या भवितव्यासाठी राजकारणातही पुढे येते,
वाईट मार्गाला जाणार्या नवर्याला चांगल्या मार्गावरही आणते,
कारण ती एक सशक्त स्त्री आहे,

जी आता दुसऱ्यासोबत स्वतः चाही विचार करते,
चार चौघात स्वतः ची इज्जत सांभाळते,
आणि इतरांकडून प्रेमाचे शब्द बोलवून घेते,
कारण ती एक सशक्त स्त्री आहे ,

तिने गगन झेप घेतली आहे मुक्तपणे संचारण्यासाठी,
तिने आवाज उठवला आहे जुन्या चालीरीती बंद करण्यासाठी,
ती शिक्षणाने पुढे गेली आहे हा समाज बदलवण्यासाठी,
कारण ती आता एक सशक्त स्त्री आहे,
ती एक सशक्त स्त्री आहे.

# जगाचा तारक

**--- सुदेश कांबळे, सेंट ख्रिस्तोफर मराठी चर्च (C.N.I) कल्याण**

जगाचा तारक जन्मी आला
राजा येशुला पाहू चला
चला तयाला भेटू चला....।। धृ ।।

पूर्व दिशेला तारा चमकला,
माघी निघाले पाहुनी त्याला.
आपणही माघे जाऊ चला
तोची अमुचा प्रभात तारा ।।१।।

धनी असुनी तो स्वर्गाचा
थारा मिळेना कोठे जगाचा
राजा असूनी नम्र तो झाला
तोची आमुचा तारणारा ।।२।।

आला हो नाताळ आनंदाचा
सांगु जगाला संदेश प्रेमाचा
देवाचा पुत्र मानव झाला
उद्धारक जगाचा जन्मी आला ।।३।।

# हायकू

**--- सुनिल सोकाळकर**

मन आठवणींच्या गर्तेत का गुंततेय?
स्वत:चेही ते भान विसरून जाते
“हसू” वा “आसू” चा खेळ करत माघारी फिरते.


तुझ्या आवडीसाठी मी का आयुष्य वेचले?
निवडीचे मोल तुला नाही कळले
म्हणूनच सवडीचे फक्त निमित्त उरले

अंगावरल्या तुषारांशी हितगुज करत
तहानलेलं मन थेंब थेंब टिपकत होतं
पावसाचं भानही त्या क्षणी विचलत होतं...

# कलाकुसर :-

## ऑस्टिन डाबरे :-






## ऑल्विन कोरिया :-






23 10 2008



### रॉयल बॅप्तिस्ट रॉड्रिग्ज :-







